पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ | वर्ष : १३ | अंक : २२१ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ संस्कार पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

४ विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावेत

५ कनिष्ठ महाविद्यालयातील दोन गुणवंतांची एमबीबीएससाठी निवड



पान ८ वर..

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयाची हंडी आम्हीच फोडणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयाची हंडी फोडणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना इशारा दिला आहे.

भाजप आमदार राम कदम यांच्या वतीने घाटकोपरमध्ये आयोजित दहीहंडी महोत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते. या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी सर्वांना दहीहंडी महोत्सवाच्या शुभेच्छा देखील दिल्या.

या वेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर विजयाची हंडी तर आम्ही फोडणारच आहोत. मात्र ज्यांनी महानगरपालिका लुटली, त्यांच्या पापाची हंडी देखील आम्ही फोडणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही जी हंडी लावू त्यातले लोणी हे सर्व सामान्यांना मिळेल, ते कोणाच्या घरात जाणार नाही, हा प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून



भारतीय सैनिकांनी पाकिस्तानच्या पापाची हंडी फोडली होती. आता मुंबईमध्ये राम कदम यांच्या माध्यमातून ऑपरेशन सिंदूरची आठवण म्हणून या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या विषयी फडणवीस म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पाकिस्तानच्या पापाच्या हंडी भारतीय सैनिकांनी फोडली होती. त्या सैनिकांना या ठिकाणी सलाम केला जात आहे. याबद्दल राम कदम यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या सैनिकांना समर्पित दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन सिंदूरमध्ये आपल्या सैनिकांनी पाकिस्तानची पापांची हंडी फोडली आणि आता येथे, त्याच सैनिकांचा सन्मान केला जात आहे. कृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीनिमित्त मी सर्वांना शुभेच्छा देतो. हा सण महाराष्ट्रातील मुंबईत मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. कितीही पाऊस पडला तरी येथील आपल्या गोविंदांचा उत्साह कमी होऊ शकत नाही. मुंबई महानगरपालिका निवडणुकीबद्दल पुढे ते म्हणाले की, पापांची हंडी आधीच फुटली असल्याने बदल घडणारच आहे. आता एक नवीन हंडी रचली जाणार आहे आणि आम्ही समाजातील सर्व घटकांना त्याचे लोणी वाटण्यासाठी काम करू.

## संक्षिप्त

### ठाण्यात दहीहंडीच्या १० थरांचा विश्वविक्रम

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : श्रीकृष्ण जन्माष्टमीनंतर आता मुंबई, ठाण्यासह राज्यातील अनेक भागांमध्ये दहीहंडीचा थरार पाहायला मिळत आहे. दहीहंडी पथके विविध भागांत जाऊन मनोरे रचून दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न करत आहेत. एकीकडे मुंबई आणि लगतच्या परिसरात मुसळधार पाऊस पडत असला, तरी गोविंदा पथकांचा उत्साह कमी झालेला नाही. दादरच्या आयडियल येथील दहीहंडी महिला गोविंदांनी फोडली. यातच ठाण्यात जोगेश्वरीच्या कोकण नगर गोविंदा पथकाने तब्बल १० थर रचून विश्वविक्रम केला.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती दहीहंडी कार्यक्रमात १० थर रचण्याचा हा विश्वविक्रम करण्यात आला. जोगेश्वरी येथील कोकण नगर गोविंदा पथकाने ही विश्वविक्रमी कामगिरी करून दाखवली. यानंतर एकच जल्लोष करण्यात आला. मी पारितोषिक आधीच जाहीर केले होते. कोकण नगर मनापासून अभिनंदन करतो. खऱ्या अर्थाने राष्ट्रभक्ती दाखवली.कुणी कितीही काही म्हणू द्या, तुम्ही मराठी एकी दाखवली. मी या पथकाला २५ लाखांचे बक्षीस जाहीर करतो, असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. काही गोविंदा पथकाना वाटते आमचा विश्वविक्रम मोडणार नाही पण दुसरे पथक देखील विश्वविक्रम मोडत असतो. विश्वविक्रम मोडण्यासाठीच असतो. याच मैदानावर आधी पण विश्वविक्रम झाला आहे आणि आताही झाला, असेही ते म्हणाले.

जोगेश्वरीचे गोविंदा पथक असून, तेथील विशाल कोचरेकर गोविंद म्हणाले की, आम्हाला आत्मविश्वास होता की, यंदा आम्ही १० थर लावणार. गेल्या २०२२ मध्ये इथेच आम्ही नऊ थरांचा विश्वविक्रम केला होता. यावेळेस आमच्या पथकात ५५० गोविंदा होते. दोन महिने सराव केला होता. पहिल्या दिवसापासून दहा थरांचा सराव करत होतो. विवेक कोचरेकर हे आमचे प्रशिक्षक म्हणाले होते की, जखमी न होता तुम्ही हे थर लावा. यादरम्यान १० थर रचल्यावर पूर्वेश सरनाईक भावूक झाल्याचे सांगितले जात आहे. येथे आलेल्या स्पॅनिश पाहुण्यांनीही यावेळी आनंद व्यक्त केला. दरम्यान, कोकणनगर नंतर आर्यन गोविंदा पथकाने संस्कृतीच्या दहीहंडीत नऊ थरांची सलामी दिली. यंदा ऑपरेशन सिंदूर जनजागृती केली जात आहे. शोले चित्रपटाला ५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल मानवंदना देण्यात आली आहे, त्यामुळे शोलेची प्रतिकृती येथे पाहायला मिळत आहे.

### ग्रामपंचायतीपुढे थाळीनाद

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : गुळुंचे (ता. पुरंदर) ग्रामस्थांनी बुधवारी (दि. १३) ग्रामपंचायत कार्यालयासमोर थाळीनाद आंदोलन केले. माळवस्तीतील ग्रामस्थांनी वर्षानुवर्षे मागणी करूनही बंदिस्त गटार योजना राबविली जात नाही. तसेच अंतर्गत रस्त्यांकडेही दुर्लक्ष केले जात आहे. त्या संतापातून हे आंदोलन करण्यात आले. गुळुंचे येथील माळवस्ती येथे शंभरहून अधिक कुटुंबे वास्तव्याला आहेत. गेल्या दहा वर्षांत येथे ग्रामपंचायतीकडून एकही विकासकाम केले गेले नाही. गटारांअभावी येथील सांडपाणी उघड्यावर साचते. त्यामुळे या परिसरात कायम दुर्गंधी असते. यातून विविध आजारांना निमंत्रण मिळत आहे. गेल्या दोन महिन्यांत येथील दहा ते बारा लहान मुलांना कावीळ झालेली आहे. यांसह येथे अंतर्गत रस्ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पूर्वीच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले आहे.या समस्यांबाबत ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रार केली आहे. मात्र त्याकडे कायम दुर्लक्ष होत असल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला. ग्रामपंचायत प्रशासनाच्या या कारभाला कंटाळलेल्या या ग्रामस्थांनी संजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी ग्रामपंचायत कार्यालयापुढे थाळ्या वाजवून निषेध व्यक्त केला.

# हरवलेला मोबाईल मिळाला; पोलिसांनी दिले ४१ मोबाईल परत

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरातील नागरिकांचे हरवलेले मोबाईल शोधून परत करण्याची मोहिम पुणे पोलिसांकडून सातत्याने राबवली जाते. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शिवाजीनगर पोलिसांनी तब्बल ५ लाख रुपये किमतीचे ४१ मोबाईल संबंधित मालकांच्या ताब्यात परत दिले.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक महेश बोळकोटगी यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील गहाळ मोबाईलचा डेटा तयार



करण्यात आला होता. त्यानंतर तांत्रिक तपासादरम्यान हे मोबाईल महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये तसेच परराज्यात वापरात असल्याचे निष्पन्न झाले. शिवाजीनगर पोलिसांनी त्या त्या जिल्ह्यातील पोलिस ठाण्याशी संपर्क साधून सर्व मोबाईल हस्तगत केले. या सर्व मोबाईलची एकत्रित किंमत जवळपास ५ लाख रुपये इतकी आहे. स्वातंत्र दिनाच्या दिवशी पोलिसांनी या मोबाईलचे मूळ मालकांना परत देऊन नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.

# सोनसाखळी चोरणारी टोळी जेरबंद; हत्येच्या गुन्ह्याची उकल

## १२ लाखांचे दहा तोळे सोन्याचे दागिने जप्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड : सोनसाखळी हिसकावणाऱ्या टोळीला पिंपरी- चिंचवड गुन्हे शाखा युनिट तीन च्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींकडून १२ लाखा ३१ हजारांचे १० तोळे सोन्याचे दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत. अहिल्यानगरमधील सुपा येथे सोनसाखळी हिसकावताना मे महिन्यात महिलेचा रस्त्यावर पडून मृत्यू झाला होता. असे एकूण वेगवेगळे १५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

याप्रकरणी अक्षय राजू शेरावत, ऋषी बुद्धिमान नानावत, अरमान प्रल्हाद नानावत आणि





सोनू फिरोज गुडदावत यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. चोरीतील सोनसाखळी, सोन्याचे दागिने विकत घेणारा सराफ खुशालसिंग जोधसिंगराव ला देखील पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चार ही आरोपी हे पादचारी एकट्या महिलेला हेरून तिच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पळ काढत असायचे. आत्तापर्यंत पुणे ग्रामीण, अहिल्यानगर, पिंपरी- चिंचवड परिसरात सोनसाखळी हिसकावल्याचे गुन्हे उघडकीस आले आहेत. दरम्यान, २० मे २०२५ रोजी अहिल्यानगर सुपा येथे आरोपी अक्षय आणि ऋषी नानावत यांनी महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावताना महिला रस्त्यावर पडून गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला होता. या प्रकरणी दोघांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल आहे. त्यांना सुपा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलं आहे. चार ही आरोपींना म्हाळुंगे परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या. ही कामगिरी पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो-लीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या टीमने केली आहे.

# मद्यधुंद चालकाची डीसीपींच्या गाडीलाच धडक; दोघांवर गुन्हा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : भरधाव जाणाऱ्या कारने वाहतुक शाखेचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांच्या शासकीय वाहनाला समोरुन जोरात धडक दिली. त्यात वाहनचालक व ऑपरेटर किरकोळ जखमी झाले.

याबाबत पोलीस अंमलदार शरद पवार यांनी मुंढवा पो-लीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी कारचालक समदिप मनमोहन सिंग (वय ३०, रा. शुभ इवान, मिडोरी वाईन्सजवळ, केशवनगर, मुंढवा, मुळ रा. हरियाना) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना मुंढवा चौकाकडून केशवनगरकडे जाणाऱ्या रोडवर शुक्रवारी रात्री साडेदहा वाजता घडली.


कारमध्ये समदिप सिंग हा कार चालवत होता. तर त्याच्या शेजारी मनीषकुमार सुमानकुमार सिंग (वय २८, रा. शुभ शगुन सोसायटी, खराडी) हा बसलेला होता. दोघेही नशेमध्ये असल्याचे दिसून आले. त्यांना मुंढवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलीस निरीक्षक बाबासाहेब निकम तपास करीत आहेत.

# दूषित पाण्यामुळे मुळा नदीत शेकडो माशांचा मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी :नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यापेक्षा सुशोभीकरणाच्या घाट घातला जात आहे. दूषित पाण्यामुळे वाकड येथे मुळा नदीत गुरुवारी (दि. १४) शेकडो मृत मासे तरंगताना दिसून आले आहेत. त्यात नदीच्या पाण्यातील धोकादायक पातळीचे प्रदूषण स्पष्टपणे दिसून येते. स्थानिक रहिवाशांनी आणि जीवितनदी व पुणे रिव्हर रिव्हायवलच्या कार्यकर्त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळास कळविले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने वाकड ते दापोडी परिसरात नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यापेक्षा सुशोभीकरण सुरू आहे. त्यास पर्यावरणवादी संघटनांनी विरोध दर्शविला आहे. सांडपाणी व औद्योगिक कचरा थांबविण्यासाठी आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे. मात्र, त्यावर महापालिकेकडून कार्यवाही झालेली नाही.



पाण्यातील ऑक्सिजनची पातळी खूपच खालावल्यामुळे वाकड येथे मासे मोठ्या प्रमाणावर मृत्यू पडले आहेत. नदी पुनरुज्जीवन करण्यासाठी सर्वप्रथम उगमापासून प्रदूषण बंद करणे, सांडपाणी योग्य प्रकारे शुद्ध करणे आणि नदीकिनारच्या वनांचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे, असे पर्याय सुचविले आहे. त्यांची अंमलबाजवणी केली नाही तर सौंदर्याच्या नावाखाली नदीचे रूपांतर निर्जीव कालव्यात होईल. आज झालेला माशांचा मृत्यू हा इशारा आहे आणि तो दुर्लक्ष करण्यासारखा नाही.

# आईशी प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून एकाचा मुलाकडून खून

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पुणे जिल्ह्यातील दौंडमध्ये तरुणाने आईसोबत प्रेम संबंध असल्याच्या संशयातून एकाची हत्या केल्याचे समोर आले. आरोपीने प्राण घातक हल्ला केल्याने त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणामुळे दौंड परिसरात खळबळ उडाली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री साडे अकरा वाजता ही घटना घडली. विशाल थोरात (रा. इंदिरानगर, दौंड) या तरुणाने प्रवीण पवार यांच्यावर कोयत्याने हल्ला केला. या हल्ल्यामध्ये पवार यांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार,





आरोपीला त्याच्या आईचे आणि प्रवीण पवार यांचे अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. या संशयातूनच त्याने प्रवीण पवार यांच्यावर कोयत्याने हल्ला केला. पवार यांच्या डोक्यावर आणि हातावर वार केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांत गुन्हा दाखल असून पोलिसांनी आरोपी विशाल थोरात याला अटक केली आहे. पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे.

# सहकारी साखर कारखान्यांच्या टिकावासाठी गाळप क्षमतेचे नवे धोरण आवश्यक : शरद पवार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : दिवसेंदिवस सहकारी चळवळीला सुरुंग लागत आहे. खाजगी कारखान्यांचे प्रस्थ वाढत असून, ते पाहून अस्वस्थता वाढत आहे. कारखान्यांबाबत समस्या निर्माण झाल्यास चर्चा कुणाशी करावी, असा प्रश्न निर्माण होत आहे. राज्यातील खासगी कारखाने राज्याबाहेरील लोकांचे असल्याने त्यांना स्थानिकांशी आस्था नाही. त्यातच या कारखान्यांची गाळपक्षमता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे कमी क्षमतेचे सहकारी कारखाने टिकणे अवघड झाले आहे. या खासगी कारखान्यांनी कामगारांची संख्यादेखील कमी केल्याने सहकार्य कारखाने त्यांच्या स्पर्धेमध्ये टिकणार नाहीत. त्यामुळे राज्य सरकारने गाळप क्षमतेबाबत विचार करणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य सहकारी साखर कारखाना संघ, राज्य सरकार यांच्यात चर्चा घडवून याबाबत धोरण ठरविण्याची गरज आहे, असे मत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केले.

साथी किशोर पवार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात, किशोर पवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर, राज्य साखर कामगार प्रतिनिधी संघाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, प्रतिष्ठानच्या सचिव वंदना



पवार, अंकुश काकडे उपस्थित होते. पवार म्हणाले, उत्तर प्रदेशात खासगी साखर कारखाने वाढत असून, तीच स्थिती आता महाराष्ट्रातही दिसत आहे. सहकारी कारखाने दिवसेंदिवस कमी होत आहेत. खासगी कारखान्यांमध्ये कमीतकमी कामगारांमध्ये काम करण्याची प्रथा सुरू झाली आहे. कारखाने टिकले पाहिजेत, मात्र, घाम गाळणाऱ्या कारखान्यात कामगारांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांचे काय, याचा विचार करावा लागेल. कारखान्याच्या गाळप क्षमतेतही मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे कमी क्षमता असलेले सहकारी कारखाने पुढील टिकणार नाही. त्यासाठी राज्य सरकारने गाळप क्षमतेबाबत धोरण आखले पाहिजे.

किशोर पवार यांच्या कार्याचा उल्लेख करत पूर्वी साखर कामगार संघटना चर्चेसाठी आल्यानंतर कामगारांच्या पदरात जास्तीतजास्त पाडून घेण्याची त्यांची भूमिका असायची. मात्र, बैठकीनंतर कारखानदार संघटनेचे नेते यांच्यात सख्य असायचे. त्यांनी कायमच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केला. सध्या मात्र, कामगारांची मानसिकता संघर्ष नको' अशी झाली आहे. यावर देखील विचार करण्याची गरज असल्याचे मत पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

पूर्वी बहुतांश तरुण डाव्या विचारांचे असायचे. सध्या मात्र तरुणांच्या विचारांना शहकाटशहा दिला जात आहे त्यांच्यात धार्मिक ओढ जास्त दिसून येत असून, लोकशाहीचा विचार पुढे नेण्यासाठी कोणताही प्रयत्न होताना दिसत नाही. आपण यात कमी पडत आहोत, अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. ठाकूर यांनी किशोर पवार हे सीमा लढ्याचे शेवटचे आधार होते, असे सांगितले.



# अक्षरधारा

## जगदीप धनकडांचं काय झालं?

**पूर्वी एक मराठी चित्रपट फार गाजला होता. त्यात मारुती कांबळेचं काय झालं? हा प्रश्न राजकीय घडामोडींवर टिपणी करताना नेहमीच वापरला जाणारा परवलीचा शब्द बनला आहे. आज या शब्दाची आठवण होण्यामागे भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांचा अचानक आजारीपणाच्या कारणामुळे राजीनामा आणि त्यानंतर ते कुठे गायब झाले हा प्रश्न अनुत्तरीत आहे ? ते आजारी असतील तर त्यांच्यावर कुठे उपचार सुरू आहेत हेही अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे पुन्हा एकदा मारुती कांबळेचं काय झालं याचप्रमाणे जगदीप धनकडांचं काय झालं असा सवाल उपस्थित होऊ लागलाय.**

भाजपच्या नेतृत्वाखालील पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार हॅट्रिक करीत सत्तेवर आहे. परंतु एकूणच सरकारची वाटचाल हुकुमशाही पध्दतीने सुरू असल्याचे वारंवार आरोप होत आहेत. निवडणूक आयोगासह संपूर्ण यंत्रणा सरकारची बटीक असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. अशातच मोदी सरकारला अपायकारक पण इंडिया आघाडीला पूरक असा निर्णय तत्कालीन उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी घेतला होता. त्याचा परिणाम म्हणून पायउतार होण्याची वेळ आली. त्यांनी त्यांच्या पदाचा जो तडकाफडकी राजीनामा दिला, तो देशासाठी एक धक्काच होता. आता त्यांच्या कथित गायब होण्यामुळे दुसरा धक्का बसला आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी राजीनामा दिल्याचे सांगण्यात आले असले, तरी शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्या मते हे खरे नाही. यामागे काहीतरी वेगळेच सत्य दडलेले आहे आणि ते बातम्यांमध्ये नसल्यामुळेच राऊत यांनी गृहमंत्री अमित शहा यांना पत्र पाठवून धनखड यांच्या अचानक राजीनाम्याबद्दल आणि त्यानंतरच्या त्यांच्या गायब होण्याबद्दल स्पष्टीकरण मागवले आहे.

संजय राऊत यांनी ही मागणी केली असली, तरी अनेकांच्या मनात हेच प्रश्न आहेत. धनखड यांच्या राजीनाम्याच्या नाट्यानंतर अनेक चर्चा सुरू झाल्या आहेत. धनखड यांना नजरकैदेत ठेवले असल्याचीही जोरदार चर्चा आहे. ही केवळ एक अफवा आहे की त्यात काही तथ्य आहे, हे जाणून घेण्यासाठीच संजय राऊत यांनी गृहमंत्र्यांना हे पत्र



पाठवले असावे. एवढेच नाही, तर धनखड यांना हजर करण्यासाठी ते सर्वोच्च न्यायालयात जाण्याच्याही तयारीत आहेत.

त्याआधीचा उपाय म्हणून त्यांनी गृहमंत्र्यांना निवेदन पाठवले आहे. राज्यसभेतील अनेक सदस्यांनी धनखड यांच्या प्रकृतीची काळजी असल्याने त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण कुणालाही यश आले नाही. म्हणूनच, माजी उपराष्ट्रपतींना त्यांच्या घरीच कैद करण्यात आल्याच्या अफवेने जोर धरला आहे. राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनीही याआधीच जगदीप धनखड यांच्या ठावठिकाण्याबद्दल शंका व्यक्त करणारे



**राजरंग**

**– अमृत चौगुले**

निवेदन जारी केले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून आपण त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहोत, पण ते फोनवरही येत नसल्याने त्यांच्या सुरक्षिततेविषयी चिंता वाटत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या नेत्यांनी उपस्थित केलेल्या शंका ही एक अतिशय गंभीर बाब आहे. देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीच्या ठावठिकाण्याबद्दल अनेक विरोधी पक्षाच्या नेत्यांना प्रश्न विचारावे लागत असतील, तर ते योग्य नाही.

धनखड यांच्या अचानक राजीनाम्यामागचे रहस्य अजूनही उलगडलेले नाही. प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिल्याचे सांगितले जात असले, तरी ज्या दिवशी त्यांनी राजीनामा दिला, त्या दिवशी ते दिवसभर अनेक बैठकांमध्ये व्यस्त होते, हे सगळ्यांनाच माहीत आहे. म्हणूनच, हे कारण कुणालाही पटणारे नाही. आपल्या राजीनाम्याबाबत स्वतः धनखड व्यक्त होतील, अशी अपेक्षा होती.

पण राजीनामा दिल्यापासून आजपर्यंत ते समाजमाध्यमांवरूनही काहीच बोललेले नाहीत.

त्यांच्या राजीनाम्याविषयी केवळ प्रसिध्दी माध्यमांमधून वेगवेगळे तर्क-वितर्क लावले जात आहेत. धनखड यांच्याशी संबंधित वेगवेगळ्या घटनांचा हवाला देत काही आडाखे बांधले जात आहेत, पण हे अंदाज म्हणजे नेमकी वस्तुस्थिती नाही आणि ते अधिकृत मानले जाऊ शकत नाहीत. राजीनाम्यानंतर त्यांनी असे मौन धारण करणे अनेक शंका-कुशंकांना खतपाणी घालते. यामुळे एक मात्र होत आहे की, राजीनाम्याच्या प्रकरणामागील गोंधळ प्रचंड वाढला आहे. अशा प्रकारामुळे अफवा आणि गैरसमज पसरण्यासाठी पोषक वातावरण तयार होते. विशेषतः उपराष्ट्रपती पदावरील व्यक्तीसंदर्भात, हे असे होणे देशासाठी शोभनीय नाही.

धनखड यांनी राजीनामा दिला त्या दिवशी त्यांचे घर आणि कार्यालय सील करण्यात आल्याच्याही बातम्या पसरल्या आहेत. हे खरे आहे की फक्त वावड्या आहेत, हे कोण स्पष्ट करणार ? जर ही कारवाई खरंच केली असेल, तर ती कुणाच्या सांगण्यावरून केली गेली, हेही अजून गुलदस्त्यात आहे. उपराष्ट्रपतींच्या राजीनाम्यासारख्या घटनेला या देशात अजिबात महत्त्व न देता ती सहज बाजूला सारली जात असेल, तर मग आपण कोणत्या पदाला महत्त्व देतो आणि त्याचा किती सन्मान करतो, हाही एक प्रश्न आहे. त्याशिवाय महत्त्वाचे म्हणजे, धनखड यांचे सार्वजनिक दर्शनच बंद झाले आहे आणि त्यांच्या परिचितांशीही ते संपर्क साधत नाहीत, हे सारे खूप खटकणारे आहे. नुकतेच निधन झालेले माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी निधनापूर्वी तयार केलेला एक व्हिडीओ नंतर सोशल मीडियावर प्रसारित झाला होता. त्यात ते आपल्याला सरकारकडून खोटेपणाने गुंतवले जात असल्याची तक्रार करताना दिसले होते. निदान सत्यपाल मलिक यांचा व्हिडीओ तरी प्रसारित झाला. पण जगदीप धनखड यांचे साधे एकही निवेदन किंवा दर्शन होऊ शकलेले नाही. ते नेमके कुठे आहेत, याचीही कुणालाच कल्पना नाही. उपराष्ट्रपती पदावरची व्यक्ती अशी सार्वजनिक जीवनातून गायब होणे शंका निर्माण करणारे आहे. ही शंका दूर करण्याची जबाबदारी सरकारची आहे.

■■■

## आत्महत्या रोखण्यासाठी जागरूकता गरजेची

**महाराष्ट्र देशात आत्महत्येचं प्रमाण दिवसागणिक वाढताना दिसत आहे. देशातच नाही तर जगभरात प्रत्येक वर्षाला जवळपास ८,५०,००० लोक आत्महत्या करतात, तर १५ मिलियन लोक आपलं आयुष्य संपवण्याचा प्रयत्न करतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, १५ ते १९ वर्षे या वयोगटातील आत्महत्या हे मृत्यूचं प्रमुख कारण आहे. आत्महत्येमागे नैराश्य, असहाय्यता आणि जीवन व्यर्थ असल्याची भावना असते. यामागे वैद्यकीय कारणंही असतात.**

आत्महत्या अर्थात स्वतःचा जीव घेणे ही वृत्ती. तणाव, दुःख, निराशा, अपयश, एकाकीपणा, अपमान आणि गरिबी, वृध्दत्व, गंभीर आजार आत्महत्येची प्रमुख कारणं म्हणता येतील. समस्या सोडवण्याचा कोणताही मार्ग नाही असे वाटणारे लोक आत्महत्या करतात. कारण आत्महत्या हा वेदना संपवण्याचा एकमेव मार्ग आहे; परंतु तुम्ही सुरक्षित राहण्यासाठी पावले उचलू शकता आणि पुन्हा तुमचे जीवन आनंदाने जगू शकता.

आत्महत्या हा मानसिक आजार आहे. दैनंदिन जीवनात आत्महत्या ही एक गंभीर समस्या आहे. एका रिसर्चमध्ये केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, १५ ते ३५ वर्षे वयोगटातील पुरुष आणि स्त्रिया जास्त आत्महत्या करतात. छोटी छोटी संकटे आली तरी हल्ली लोकांच्या मनात आत्महत्येचे विचार मनात घोंगावू लागतात. समस्या, दुःख प्रत्येकाच्या वाट्याला असतात. त्यावर मात करायची तयारी ठेवली पाहिजे.

आत्महत्या करून संकटे संपत नसतात. एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येमुळे वाढत्या आत्महत्यांचा विषय ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आता वाढत्या आत्महत्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज झाली आहे. कोणाचेही मन ओळखणे तशी अवघड गोष्ट असते. मनात काय विचार सुरू आहेत हे ओळखणे तसे कठीणच आहे. आपल्याकडे लोक काय म्हणतील, आपल्यातील दोष किंवा आपल्यातला कमकुवतपणा दुसऱ्यासमोर दाखवायचा नाही अशी संस्कृती आहे. मानसिक आजारांबद्दल अजूनही संकोच, लाज किंवा नकारात्मकता प्रत्येकामध्ये असते.

कामाचा ताण, स्पर्धा, अपेक्षा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणाला काही सांगायचे नाही हाच मोठा धोका आहे. त्यामुळे दरवर्षी लाखो लोक मानसिक ताण, सामाजिक दबाव किंवा एकटेपणामुळे टोकाचे पाऊल उचलत आपला जीव गमावतात. बहुतेक लोकांना जगायचे असते, पण त्यांची परिस्थिती किती भयानक आहे आणि त्यांना पर्यायी उपाय



दिसत नसल्याने ते अडकलेले वाटतात. काही लोकांसाठी, तर्क करण्याची आणि समस्या सोडवण्याची सकारात्मक उपाययोजना करण्याची त्यांची क्षमता प्रभावित होते, परिणामी आवेगपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते.

दहावी, बारावी परीक्षेचीत अपयश आले तरी मुलांच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागतात. ही चांगली गोष्ट नाही. दहावी, बारावी म्हणजे पूर्ण आयुष्य नसते. पुढे भरपूर आयुष्य असतं. हे समजावून सांगण्याची गरज असते. आज आपल्या राज्यात आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. विशेषतः ते तरुणांमध्ये जास्त आहे. नैराश्य, चिंता, एकटेपणा हे दिसत नसले तरी ते आजारच आहेत.

**वास्तव**

**– अस्मिता देसाई**

वारंवार उदास राहणे, सातत्याने निराशावादी बोलत राहणे, स्वतःला इजा करण्याबद्दल बोलणे, सामाजिक माघार घेणे, एकटे राहण्याची इच्छा व्यक्त करत राहणे. मानसिक आरोग्याच्या समस्या, नोकरी गमावणे, कर्ज, कौटुंबिक तणाव, आधाराचा अभाव, सामाजिक संपर्काचा अभाव असतो. यामुळे आत्महत्यांचे विचार मनात येत असतात. एकमेकांशी बोलण्यापेक्षा किंवा गोष्टी शेअर करण्यापेक्षा आयुष्य संपवण्याचे धाडसी पाऊल उचलले जाते. ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

मुळात कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते हे लक्षात घेतले पाहिजे. कारण अंधारानंतर प्रकाश हा असतोच. त्यामुळे एक नवी पहाट येतेच. त्यामुळे कुठल्याही समस्येवर आत्महत्या हा तोडगा नाही. कोणतीही समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करत राहणे गरजेचे असते. त्या प्रयत्नांना यश मिळेलच असा सकारात्मक विचार करणे गरजेचे असते. या सकारात्मतेमुळेच वेगळी ऊर्जा मिळते. त्यानंतर एक वेगळाच उत्साह येत असतो.

आजच्या डिजिटल युगात संवाद कमी झाला आहे. पण, 'संवाद' हा आत्महत्या रोखण्यासाठीचे उत्तम औषध आहे. आपल्या अडचणी, समस्या एकमेकांना सांगितल्या तर त्या सोडवण्यासाठी मदत होते. त्यामुळे जवळचे मित्र, जवळची व्यक्ती यांच्याशी संवाद ठेवणे महत्त्वाचे असते. यामुळे मनावरील ताणही हलका होतो. तसेच ताण असेल तर समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ यांचा सल्लाही घेणे महत्त्वाचे ठरते. तुम्ही एकटे नाही, कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते. त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागृत करणे गरजेचे असते. त्यामुळे त्यांची सामाजिक, शैक्षणिक प्रगती सुधारण्यास मदत होते, असे आशेचे संदेश देणेही त्यांच्यामध्ये बळ निर्माण करू शकतात.

त्यामुळे असे आशेचे संदेश देणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धेच्या काळात शाळेतल्या विद्यार्थ्यांपासून ते तरुण आणि ज्येष्ठांपर्यंत तणावाचे प्रमाण अधिक आहे. हा तणाव दूर करण्यासाठी योग्य पध्दतीने समुपदेशन होणे गरजेचे आहे. तणावाविरुध्द लढाई जिंकणे महत्त्वाचे आहे. आत्महत्येचे विचार टाळण्यासाठी सर्वांनी मिळून काम करणे गरजेचे आहे. कोणाला मदतीची गरज असेल तर त्यासाठी तत्परता दाखविली तर आपल्यासोबत कोणीतरी आहे, अशी आत्मीयता त्यांच्यामध्ये निर्माण होते. त्याच्यातून त्यांना ताण कमी होण्यास मदत होते. शारीरिक आरोग्याइतकीच मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही आता काळाची गरज बनली आहे. त्यामुळे आत्महत्येसारख्या गंभीर विषयाबाबत जागरूकता निर्माण करणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे.

समस्येबद्दल, जागरूकता वाढवण्याबद्दल नाही तर ती आत्महत्या समस्येला कारणीभूत ठरणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्याबद्दल आहे. राष्ट्रीय आत्महत्यांचा डेटा नोंदवल्या गेलेल्या शेवटच्या काळात ३,००० हून अधिक लोकांनी आत्महत्या केल्या हे जाणून घेणे एक गोष्ट आहे. चिंता आणि ताणतणावांना दाबून ठेवणे (कारण कोणीतरी असे मानते की जर ते याबद्दल बोलले तर त्यांना दोषी ठरवले जाईल किंवा कमकुवत पाहिले जाईल) आत्महत्येच्या दरात वाढ होण्यास हातभार लावते हे जाणून घेणे दुसरी गोष्ट आहे. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी मानसिकता बदलणे आवश्यक आहे. ऑस्ट्रेलियाच्या चिंताजनक आत्महत्येच्या आकडेवारीबद्दल जागरूकता वाढवणे ही एक चांगली सुरुवात आहे. बदल प्रभावी होण्यासाठी, आपल्यापैकी अधिकाधिक लोकांना आत्महत्येच्या दरामागील कारणे समजून घेणे आवश्यक आहे.

■■■

## अन्नाची गरज आणि भूकेचे स्वातंत्र्य

**स्वतंत्र भारतात व्यक्ती स्वातंत्र्याप्रमाणेच प्रत्येकाला आहाराचे स्वातंत्र्य आहे. पण नुकताच १५ ऑगस्ट दिनी मांसाहार बंदी वरून विषय ऐरणीवर आला आहे. सरकार आणि प्रशासन जनतेच्या आहारातही हस्तक्षेप करत आहेत. स्वातंत्र्यदिन साजरा करत असताना जनतेच्या स्वातंत्र्यावर आणि मूलभूत अधिकारांवर गदा आणण्याचा अधिकार या आयुक्तांना कोणी दिला, हे विचारण्याची ही वेळ आहे.**

स्वातंत्र्यदिनीच कल्याण-डोंबिवली, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मालेगाव महापालिका क्षेत्रातील आयुक्तांनी कत्तलखाने आणि मांसविक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. कोणीही मागणी केली नसताना सरकार आणि प्रशासन जनतेच्या खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये हस्तक्षेप करत आहे. जनतेच्या सुख-दुःख आणि सणांमध्ये सहभागी होणारा महाराष्ट्र आता बंदीच्या बंधनात अडकत आहे. जनतेच्या स्वातंत्र्यावर आणि मूलभूत अधिकारांवर गदा आणण्याचा अधिकार या आयुक्तांना कोणी दिला, हे विचारण्याची ही वेळ आहे. मांसाहार केला नाही याचे दुःख नाही, पण ही वाढती प्रवृत्ती धोकादायक आहे.

आज साजरा होणारा ७९ वा स्वातंत्र्यदिन प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा दिवस आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याची जाज्वल्य भावना प्रत्येकाच्या मनात आहे. राष्ट्रासाठी बलिदान आणि त्याग केलेल्यांना वंदन करण्याचा हा उत्सव आहे. हा कुठलाही धार्मिक सण नसून राष्ट्रीय उत्सव आहे. त्यामुळे



स्वातंत्र्यदिनीही शाकाहार-मांसाहार वाद उभा करून सरकार त्याचे धार्मिक ध्रुवीकरण करू पाहत आहे. या दिवशी सरकारचे आचरण आणि अन्नाचे स्वातंत्र्य अबाधित राहणार नसेल, तर असल्या स्वातंत्र्याचा काय उपयोग? सरकार नियमांच्या नावाखाली नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्यावर गदा आणू पाहत आहे.

जेव्हा मानवाची उत्पत्ती झाली, तेव्हा सुरुवातीला तो निसर्गात राहत होता. जंगली श्वापदांपासून रक्षण करण्यासाठी आणि अन्नाच्या शोधात तो टोळ्या करून राहू लागला. शिकार करून खाणे हेच त्याचे मुख्य अन्न होते. पण शिकारीसाठी आणि अन्नासाठी कायम भटकंती करणे हे त्रासदायक आणि असुरक्षित होते. अग्नीचा शोध लागल्यानंतर हळूहळू तो मांस भाजून खाऊ लागला. पुढे मासेमारी करून आणि जंगलातून फळे, कंदमुळे, बियाणे गोळा करून तो पोट भरू लागला. शेतीचा शोध लागल्याने माणूस एका जागी स्थिरावला आणि त्याची अन्नाची गरज भागू लागली. अग्नीचा शोध हा मानवी उत्क्रांतीतील एक महत्त्वाचा टप्पा होता. यामुळे अन्नाची सुरक्षितता वाढली माणूस अन्न भाजून खाण्याबरोबरच शिजवून खाऊ लागला आणि त्याचे सामाजिक जीवन सुधारले.

प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये मांसाहार केवळ स्वीकारार्हच



**अर्थतरंग**

**प्रा. संजय ठिगळे**

नव्हता, तर तो धार्मिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग होता. अनेक भारतीय देवदेवतांना कोंबडी-बकरीचा बळी दिला जातो, मांसाहारी नैवेद्य दिला जातो. सणासुदीला बहुतांश घरांमध्ये मांसाहार असतो. त्यात पवित्र अपवित्र असे काही नसते. शिक्षणाने ब्राह्मण समाजाने प्रगती केली. आरोग्याच्या दृष्टीने मांसाहार पचायला जड असतो आणि त्यातून आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात, हे त्यांच्या लक्षात आले. त्यातच मनुस्मृतीमध्ये मांसाहार करणे पाप मानले आहे, तसेच अनेक धर्मग्रंथात उत्तम आहार म्हणून शाकाहाराचा पुरस्कार केला आहे. त्यामुळे ब्राह्मण समुदायाने शाकाहाराचा अंगीकार केला. त्याचबरोबर जैन आणि इतर काही धर्मामध्ये अहिंसेला उच्च स्थान असल्याने त्यांनीही शाकाहाराचा अंगीकार आणि पुरस्कार केला. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटीपेक्षा जास्त आहे. राज्यात ८० टक्के हिंदू, सहा टक्के बौध्द, १२ टक्के मुस्लिम, एक टक्का जैन आणि एक टक्का ख्रिस्ती धर्मीय लोक आहेत. काही प्रमाणात शीख, पारशी आणि इतर धर्मीय आहेत. महाराष्ट्राच्या एकूण हिंदू लोकसंख्येच्या आठ ते दहा टक्के ब्राह्मण आहेत. दहा-वीस टक्के लोकसंख्या सोडली, तर बहुतांश लोक मांसाहार करतात, हे सत्य समजून घेतले पाहिजे. मांसाहारातून कष्ट करणाऱ्यांच्या शरीरातील सर्वाधिक प्रथिनांची (प्रोटीन) गरज भागवली जाते. डॉक्टरही अनेक रुग्णांना मांसाहार करण्याचा सल्ला देतात. श्रावणात अनेक लोक शाकाहार करतात. श्रावणामध्ये किंवा हिंदू सणांच्या वेळी कुणीही मांसविक्री बंद ठेवावी अशी मागणी करत नाही, कारण ती त्यांची जगण्याची पध्दत आहे. कुणाला तरी खूश करण्यासाठी जर सरकार शाकाहार-मांसाहार वाद उभा करत असेल, तर ते बेकायदेशीर आहे. देशामध्ये आणि राज्यामध्ये हिंदुत्ववादी सरकार अस्तित्वात आहे त्यामुळे सरकारचा अजेंडा हिंदुत्वासोबत शाकाहाराकडे झुकलेला आहे, हे लपून राहिलेले नाही. हिंदुत्ववाद म्हणजे ब्राह्मणवाद असाही सरकारचा समज असावा. त्यातून हिंदुत्ववाद म्हणजे शाकाहार अशी व्याख्या सरकारला करायची असेल. महानगरांमधील बिगर-महाराष्ट्रीयन लोक शाकाहाराचा पुरस्कार करत आहेत. मुंबई आणि इतर महानगरांत शाकाहारी सोसायट्या उभ्या राहिल्या आहेत, जिथे महाराष्ट्रीयन आणि मांसाहारींना परवानगी नाही.

मुंबईतील कोळीवाडे आणि मच्छी मार्केट हलवण्यासाठी जैन, गुजराती, मारवाडी लोक जोर लावत आहेत. या सगळ्याला सरकारचा छुपा पाठिंबा आहे. ही मुंबई कामगारांची, कोळ्यांची, आगऱ्यांची आणि बहुजनांची आहे, हे सरकार आणि परप्रांतीय विसरून गेले आहेत. त्यामुळेच त्यांची भाषिक, भावनिक, सांस्कृतिक, सामुदायिक मस्ती सुरू आहे. हे वेळीच थांबले नाही, तर धार्मिक ध्रुवीकरणासोबतच सांस्कृतिक ध्रुवीकरण राज्याच्या जडणघडणीला घातक ठरेल. शाकाहारी किंवा मांसाहारी अन्न निर्माण करण्याचे काम येथील शेतकरी राजा करतो. शेळी पालन, कोंबडी पालन, वराह पालन, दुध व्यवसाय हे येथील शेतकरी वर्गाचे प्रमुख उद्योग आहेत. हिंदू धर्मातील खाटीक, धनगर, कोळी समाज आणि इतर लोकही मांस आणि मच्छी विक्री व्यवसायातून आपला उदरनिर्वाह करतात. शेतकरी, शेतमजूर, व्यापारी आणि ग्राहक ही एक साखळी आहे. त्यामुळे अन्नाची गरज म्हणून शाकाहाराबरोबरच मांसाहाराकडे पाहिले पाहिजे.

जागतिक उपासमार निर्देशांकामध्ये भारताची उपासमारीची स्थिती गंभीर आहे. २०२४ मध्ये भारत १२५ देशांपैकी १०५ व्या क्रमांकावर होता. राज्यातील मेळघाट, नंदुरबार, जव्हार, मोखाडा, तलासरी येथे आजही कुपोषणामुळे शेकडो बालकांचा मृत्यू होतो. योग्य उपचारांअभावी गरोदर माता आणि मुलांचा मृत्य होतो दुर्गम भागात शरीराच्या गरजा भागवणारे सकस अन्न मिळत नाही. शहरातील कित्येक लोक रोज उपाशी झोपतात किंवा भीक मागून गुजारा करतात. इथे मात्र मायबाप सरकार काय खावे आणि काय खाऊ नये या धर्मचक्रात अडकले आहे. अन्नपदार्थातील भेसळ आहे; मात्र, सरकार या अन्नपदार्थातील भेसळ रोखण्यास अपयशी ठरले आहे.

■■■

## साप्ताहिक राशी भविष्य

**दि. १७ ऑगस्ट २०२५ ते २३ ऑगस्ट २०२५**

**मेष :** घरात उत्साहवर्धक घटना घडल्याने तरुणमंडळी आनंदात राहतील. नवीन ओळखी होतील. प्रसंगनिष्ठ राहून आपले काम साधून घेण्यात आज आपल्याला यश लाभणार आहे. हौसे मौजेखातर पैसा खर्च होईल. मनस्वास्थ लाभेल. स्वत:ची प्रतिष्ठा उंचावण्याकरीता आपल्या बुध्दीकौशल्याचा वापर करुन घ्याल. महत्त्वाची कामाची कार्यवाही होईल. कलाकारांच्या हातून चांगल्या कलाकृती घडतील. आपल्या अंगभूत कलागुणांना भरपूर वाव मिळेल.

**वृषभ :** समाजात आपल्या मतांचा आदर केला जाईल. आपल्या व्यक्तीमत्वाचा चांगला ठसा उमटवाल. उधारी उसनवारी वसुल होईल. नवीन आर्थिक गुंतवणूक करताना विचारपूर्वक करावी. कुटुंबात सुसंवाद साधलात तरच आपला निभाव लागणार आहे. आकर्षक खरेदी कराल. भावंडांसोबत सुसंवाद साधाल. अनेकांचे सहकार्य लाभेल. विश्वास आणि प्रामाणिकपणाने प्रयत्न केलेत तर इतरांची मदतही तुम्हाला होईल.

**मिथुन :** नवनिर्मितीचा आनंद घ्याल. नवनवीन कल्पना आकार घेतील. कामाच्यामानाने आपली आवक कमी राहण्याची शक्यता आहे. आपल्या कार्यकौशल्यामुळे कार्यक्षेत्रातून आपली प्रशंसा केली जाईल. आपल्या इच्छा, आकांक्षा कृतीत आल्यामुळे समाधान लाभेल. आपल्या व्यक्तीमत्त्वाचा चांगला ठसा उमटेल. वाजवी ध्येय प्राप्त करु शकाल. तीव्र इच्छाशक्ती व प्रगल्भ विचारसरणी यांतून आपल्या अडचणींवर सहजपणे मात कराल.

**कर्क :** भविष्यकाळाच्यादृष्टीने आर्थिक तजवीज करणे शक्य होईल. मोठी आर्थिक उलाढाल केली जाईल. आपण आव्हानात्मक कामे स्वीकारुन यशस्वी करुन दाखविणार आहात. आशावादी धोरण स्वीकारा. आपले अचूक अंदाज व योग्य व्यक्तींकडून मिळणारी मदत यामुळे आपली निकड भागणार आहे. मित्रपरिवाराबरोबर वेळ मजेत घालवाल. आपल्या इच्छा, अपेक्षा कृतीत आल्याने समाधान लाभेल.

**सिंह :** आपल्या व्यवसायातील रेंगाळलेली कामे मार्गी लावता येतील. वरिष्ठांकडून आपल्या कामाची प्रशंसा होईल. नवोदीत कलाकारांना आपल्या क्षेत्रात सुसंधी लाभतील. प्रतिष्ठीत व्यक्तींच्या ओळखीतून लाभ होतील. आशावादी धोरणाचा अवलंब केलात तर आपले ध्येय गाठणे शक्य होईल. अनुत्तरीत प्रश्न सुटतील. नोकरीमध्ये समाधानकारक स्थिती राहील. फार मोठया यशाची अपेक्षा धरु नका. आपण हाती घेतलेल्या कामात यश लाभेल. सार्वजनिक कामात प्रतिष्ठा लाभेल. उत्तरार्धात आपण हाती घेतलेल्या कामात यश मिळण्यासाठी आपल्याला थोडे थांबावे लागणार आहे.

**कन्या :** सार्वजनिक कामात पतप्रतिष्ठा लाभेल. दैनंदिन कामे सुरळीत पार पडल्याने नोकरीत समाधानकारक स्थिती राहील. प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी होणार आहे. बौध्दीक व कला क्षेत्रात सुसंधी लाभतील. आपल्या आरोग्याच्या तक्रारींकडे लक्ष देण्याची गरज आहे. व्यवसाय उद्योगात आशावादी धोरण स्वीकारा. व्यवसाय उद्योगात वापरलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आपणांस लाभदायक राहील. नोकरी-व्यवसायातून आर्थिक लाभ घडून येतील. बढती बदलीचे योग येतील.

**तूळ :** काही खोट्या गोष्टी कानावर आल्यामुळे रागाचा पारा वर जाईल. भावंडांना मदतीचा हात पुढे कराल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल. करमणूकीच्या कार्यक्रमातून आनंद मिळवाल. महिला दैनंदिन जीवनातून विरंगुळा शोधण्याचा प्रयत्न करतील. विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात यश लाभेल. आपली जिद्द व महत्त्वाकांक्षा यामुळे आपले ध्येय गाठणे सहज शक्य होईल. आपली सामाजिक प्रतिष्ठा उंचावणाऱ्या घटना घडतील. तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला लाख मोलाचा ठरेल. नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.

**वृश्चिक :** विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. भागीदारीच्या व्यवसायात गुंतागुंत वाढेल. अथक परिश्रमाअंतीच आपल्याला यश मिळणार आहे. त्यामुळे प्रसंगनिष्ठ राहून आपले काम साधून घेण्यात आज आपल्याला यश लाभणार आहे. कवि, गायक, कलाकार, लेखक, साहित्यिक, संपादक यांना चांगल्या संधी लाभतील. नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. प्रसिध्दीच्या झोतात राहता येईल. जवळचे प्रवास टाळावे. कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका.

**धनु :** नोकरी-व्यवसायातून आर्थिक लाभ घडून येतील. बढती बदलीचे योग येतील. मनस्वास्थ लाभेल. व्यवसायात नवीन योजना राबवू शकाल. अनेक कामातून सफलता मिळणार आहे. जनसंपर्कातून लाभ होतील. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. काही प्रभावी लोकांनी मदत केल्याने उत्साह वाटेल. त्यामुळे मनातील गोंधळही कमी होईल. कामाचा ताण जाणवणार नाही. ज्या लोकांमुळे तुम्ही अडचणीत येता, अशा लोकांपासून आज लांब रहा. कुणीतरी तुम्हाला आव्हान देण्याचा प्रयत्न करेल.

**मकर :** राहत्या जागेचे किंवा व्यवसायाच्या जागेचे प्रश्न सुटतील. महिला स्वत:च्या पध्दतीने गृह सजावट करतील. महिलांना बदलाची नितांत गरज भासेल. उपासना मार्गातील लोकांना चांगली अनुभूती मिळेल. आपल्याला चांगला मार्गदर्शक भेटेल. नवनवीन कल्पना आकार घेतील. व्यवसाय उद्योगात नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल. शैक्षणिक क्षेत्रात परदेशातील संस्थांशी संबंध येतील. आपली आर्थिक बाजू बळकट करणाऱ्या घटना घडतील. जुनी थकेलेली येणी वसूल होतील. आरोग्याच्या जुन्या तक्रारी डोकेवर काढतील.

**कुंभ :** जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक धार्मिक शुभ-समारंभाचे आयोजन केले जाईल. मिष्टान्न भोजनाचे योग येतील. हातून पुण्यकर्म घडेल. घरातील सुखसुविधा वाढविण्याकरीता महिला नवीन खरेदीचे मनसुबे आखतील. सतत पाहुण्यांची वर्दळ राहील. नवपरिणीतांना गोड बातमीची चाहूल लागेल. विद्यार्थी वर्गाला स्पर्धापरीक्षांतून चांगले यश लाभेल. जीवाभावाच्या व्यक्तीने दिलेला सल्ला लाख मोलाचा ठरेल.

**मीन :** महत्वाच्या निर्णयात योग्य व्यक्तिचे मार्गदर्शन लाभेल. संतसज्जनांचा सहवास लाभेल. धार्मिक स्थळांना भेटी देण्याचे योग येतील. आजूबाजूच्या लोकांवर तुमच्या व्यक्तीमत्त्वाचा प्रभाव पडेल. अवघड कामे सहजतेने मार्गी लागतील. भावंडांसोबत सुसंवाद साधाल. आपले कार्यक्षेत्र विस्तृत करण्याचा प्रयत्न कराल. अनेकांचे सहकार्य लाभेल. दैनंदिन कामात थोडी दगदग झाली तरी त्याचे फळ उत्तम मिळेल. आपले काम दुसऱ्यावर सोपवू नका. महिला स्वत:च्या पध्दतीने गृह सजावट करतील.

# निरोगी जीवनाचे स्वातंत्र्य जनजागृती अभियाना अंतर्गत उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र वाटप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**इंदापूर :** १५ ऑगस्ट निमित्त आज उपजिल्हा रुग्णालय इंदापूर येथे थाटामाटात भारत देशाचा ७९ वा स्वतंत्र दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या क्रस्ना डायग्नोस्टिक्स सिटी स्कॅन विभागाच्याच्या वतीने *'निरोगी जीवनाचे स्वातंत्र्य जनजागृती अभियान'* राबविण्यात आले.

या अभियाना अंतर्गत जनतेला अधिक पारदर्शक, जलद, सक्षम आणि उच्च दर्जाची आरोग्यसेवा देणाऱ्या इंदापूर उपजिल्हा रुग्णालयाच्या सर्व स्टाफला उल्लेखनीय कामगिरी बद्दल प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले. प्रमाणपत्राचे वितरण इंदापूर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सिद्धार्थ नामपल्ले व उपजिल्हा रुग्णालयाचे सर्व वैद्यकीय अधिकारी यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचा सर्व स्टाफ उपस्थित होता.



या कार्यक्रमावेळी निरोगी जीवनाचे महत्व पटवून देत असताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. सिद्धार्थ नामपल्ले यांनी चांगले आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक तंदुरुस्ती नाही, तर मानसिक आणि सामाजिक कल्याण देखील आहे.

निरोगी जीवनशैली जगल्याने अनेक फायदे मिळतात, जसे की दीर्घायुष्य, आजारांचा धोका कमी, ऊर्जा पातळी वाढणे आणि मानसिक स्वास्थ्य सुधारणे असे मत मांडले व मार्गदर्शन केले.

सदर अभियान यशस्वी होण्यासाठी क्रस्ना डायग्नोस्टिक्सचे सिटी स्कॅन प्रोजेक्ट प्रमुख चिराग चोरडिया, पुणे आणि कोल्हापूर विभागाचे ऑपरेशनल मॅनेजर इजाज मुल्ला, क्लस्टर मॅनेजर बाबुराव दुबे यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी इंदापूर उपजिल्हा सिटी स्कॅन विभागाचे इन्चार्ज प्रेम कडवळे, संदेश कांबळे, अनुज माळवदे, आफताब पटेल, प्रतीक्षा रूपनवर, वैष्णवी कोकरे आणि विजय नगरे यांनी योगदान दिले.

---

## ओतूरला स्वातंत्र्यदिनानिमित्त १५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** शिवसह्याद्री युवा मंच व चैतन्य हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ओतूर

( ता.जुन्नर ) येथे भव्य ३४ वे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये १५१ रक्तदात्यांनी रक्तदान केल्याची माहिती शिव सह्याद्री युवा मंचचे गौरव डुंबरे यांनी दिली.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध व्यापारी हाजी चांद मोमीन यांच्या हस्ते पार पडले.,



या कार्यक्रम प्रसंगी ओतूर गावच्या सरपंच छाया तांबे, उपसरपंच प्रशांत डुंबरे,माजी जि.प.सदस्य भानुविलास गाढवे, मोहित ढमाले,श्री कपर्दिकेश्वर देव-धर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे,श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे,सिताराम तांबे,संजय डुंबरे,ओतूरचे माजी सरपंच गंगाराम महाराज डुंबरे, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि ओतूर गावातील सामाजिक,राजकीय,शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्तित होते. प्रत्येक रक्तदात्यास शिवसह्याद्री युवा मंचाच्या वतीने एक आकर्षक भेट वस्तू देण्यात आली.

संकलन झालेले रक्त पुना ब्लड बँक नारायणगाव यांना देण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसह्याद्री युवा मंचाचे गौरव डुंबरे,मयूर मते,शरद तांबे,सिद्देश कर्डीले,अभिजित दिवटे,निखिल काकडे,वैभव हिंगे,आशिष गोंदके,राहुल तांबे, हर्षल महापुरे,अभिषेक घोलप,अभिषेक डुंबरे, संतोष डुंबरे, मनोज पटेल, प्रमोद लोखंडे, शुभम ढोबळे,अमोद फापाळे, योगेश जगताप, डॉ वैभव गायकर यांनी परिश्रम घेतले.

## ओतूर पोलिसांकडून विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्रे हाताळण्याचे धडे

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ओतूर पोलीस स्टेशन येथे दिनांक १५ ऑगस्ट रोजी अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसी चे विद्यार्थी,श्री गाडगे महाराज विद्यालयातील विद्यार्थी यांना विविध शस्त्रांबाबत ओतूर पोलीस स्टेशनच्या वतीने माहिती देण्यात आली. संरक्षण दलाबाबत विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी व बहुसंख्य तरूणांनी संरक्षण दलात यावे, याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी, विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी सदरचा उपक्रम राबविण्यात आला. सदर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी वेगवेगळ्या शस्त्रांबाबतची माहिती दिली.यावेळी ओतूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव,पोलीस उपनिरीक्षक संदीप आमने तसेच पोलीस अमलदार, अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचे प्राध्यापक राजेंद्र अंबावणे, विनायक कुंडलिक, निलेश हांडे, सुवर्णा डुंबरे व गाडगे महाराज आश्रम शाळेचे प्रकाश मोघे सर, सुनील खुपसे हे उपस्थीत होते.



---

## ओतूर पोलिसांनी राबवली अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** ओतूर पोलीस स्टेशन येथे दि.१५ ऑगस्ट रोजी अण्णासाहेब वाघिरे कॉलेजमधील एनएसएस व एनसीसी चे विद्यार्थी,श्री गाडगे महाराज विद्यालय, ओतूर येथील विद्यार्थी व ओतूर पोलीस स्टेशन येथील अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या उपस्थितीत अमली पदार्थ सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामा बाबत अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम कार्यक्रम राबविण्यात आला.



सदर रॅली मध्ये ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव,पोलीस उपनिरीक्षक संदीप आमने तसेच पोलीस अमलदार, तसेच अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचे प्राध्यापक राजेंद्र अंबावणे, विनायक कुंडलिक, निलेश हांडे, सुवर्णा डुंबरे व श्री गाडगे महाराज आश्रम शाळेचे प्रकाश मोघे सर, सुनील खुपसे सर हे हजर होते.

## गोदावरी बायोरिफायनरीज लि. मध्ये स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** साकरवाडी येथील गोदावरी बायोरिफायनरीज लि. येथे भारताचा स्वातंत्रदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आलायावेळी कारखाना कार्यस्थळावर डायरेक्टर सुहास गोडगे यांच्या हस्ते ध्वजावंदन करण्यात आले. गोदावरीतील सर्व सुरक्षा अधिकारी, सोमैया विद्या मंदिर साकरवाडी, लक्ष्मीवाडी व शारदा इंग्लिश मेडियम स्कूल कोपरगाव येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक व शिस्तबद्द संचलन करून मानवंदना दिली.



देशाला स्वातंत्र्य मिळालेचा आनंद प्रत्येक भारतीयाने साजरा केला पाहिजे. स्वातंत्र्य मिळावे म्हणून अनेक हुतातम्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांच्या त्यागाला ,आणि त्यांनी केलेल्या प्रयत्नांना अभिवादन आपण केले पाहिजे. असे आवाहन सुहास गोडगे यांनी उपस्थितांना केले. यावेळी कारखान्याचे मुख्य तांत्रिकी अधिकारी श्री. प्रवीण विभूते यांनी उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाचे महत्व सांगून शुभेच्छा दिल्या.

स्वातंत्र्य दिनानिमित्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत नेत्रदीपक यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. सोमैया विद्या मंदिर साकरवाडी, लक्ष्मीवाडी व शारदा इंग्लिश मेडियम स्कूल कोपरगाव येथील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य, गाणे, नाटक आणि शालेय विद्यार्थ्यांमधील भाषणे झाली.

---

## श्री गाडगे महाराज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची इस्त्रो स्पेस सेंटरला भेट

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** गाडगे महाराज मिशन मुंबई संचलित गाडगे महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांची अहमदाबादच्या गुजरात इस्त्रो स्पेस एक्झिबिशन सेंटरला भेट दिली याबाबत विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी माहिती दिली.

एरोस्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट पुणे व श्रीमंतयोगी सुवर्ण स्मारक ट्रस्ट जुन्नर ,जुन्नर तालुक्याचे आमदार शरद सोनवणे यांच्या संयुक्त विद्यमाने चार ते सात ऑगस्ट या काळात या अभ्यास दौऱ्याच्या आयोजन केले होते त्यात गाडगे महाराज विद्यालय ओतूर येथील कार्तिकेय प्रशांत कुतळ, समृद्धी भावेश अहिनवे यांनी सहभाग घेत ला.

या भेटीमध्ये सॅटॅलाइट थ्रीडी सोलर सिस्टम मॉडेल, रॉकेट इंजिन मॉडेल ,सौर यंत्रणेवरील प्रकाशध्वनी शो ,चंद्रयान तीन मोहीम गुजरात सायन्स सिटी,आडालज स्टेप वेल ,अक्षरधाम मंदिर ,अमोल डेरी कांकरिया लेक, साबरमती साबरमती आश्रम व्हिंटेज कार म्युझियम ,डायनासोर पार्क या ठिकाणी भेटी दिल्याचे विद्यालयाचे विद्यार्थी कार्तिकेय कुतळ याने सांगितले.

शिक्षक धीरज कुमार सोनवणे म्हणाले की,या विद्यार्थ्यांना विज्ञानाची एक चिकित्सकृती जागृत होऊन आपल्या भारतीय अंतराळ कार्यक्रमाची प्रगती पाहण्याची संधी मिळाली भारताच्या अंतराळ संशोधन आणि मोहिमांची माहिती त्यांनी घेतली या भेटीमुळे इतर विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची एक प्रकारे आवड निर्माण झाली व यातून इतर विद्यार्थ्यांनी ही प्रेरणा घेतली.अशा भेटीतूनच उद्याचे शास्त्रज्ञ निर्माण होतील असेही ते म्हणाले.

या विद्यार्थ्यांचे गाडगे महाराज शिक्षण संकुल व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन पाटील,अरूण वाकचौरे, गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने,पर्यवेक्षक कैलास महाजन,माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक बाबुलाल थोरात,प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन घाडगे,शिक्षक प्रतिनिधी मनीषा ठाकरे,सुनील पोकळे, दीपक पाटील, तुषार पानसरे ,निवृत्ती कुकडे ,अशोक पाटील ,रामदास बगाड,शोभा तांबे,प्रदीप कुमार मिरगे,संजय मेटकरी,सचिन मुखरे,सुनील खुपसे ,भानुदास ढोबळे,प्रकाश मोधे यांच्या हस्ते सत्कार करून,अभिनंदन करण्यात आले.

## जांबूत येथे ७९वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीच्या उत्साहात साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**जांबूत :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जांबूत येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा परिसर , फुलांची सजावट व रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सुशोभित झाला होता. गावात 'जय हिंद', 'भारत माता की जय' चा घोष घुमू लागला होता. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी प्रभात फेरीने झाली. शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणाबाजी करत ग्रामपरिसरातून फेरी काढली. यानंतर




मुख्याध्यापकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि राज्यगीताच्या सादरीकरणाने संपूर्ण परिसर दुमदुमला.यानंतर संचलन मानवंदना, अध्यक्ष निवड, अनुमोदन व प्रास्ताविक सत्र पार पडले. विद्यार्थ्यांकडून प्रभावी कवायत, देशभक्तिपर भाषणे आणि स्वातंत्र्य संग्रामाची आठवण करून देणारे नृत्य-गीत सादर झाले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला.

---

## संस्कार पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिक्रापूर :** स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट या दिवशी संस्कार पब्लिक स्कूल शिक्रापूर येथे स्वातंत्र्य दिन सोहळा अगदी उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला . विद्यार्थ्यांनी केलेली कवायत व नृत्य या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले .शाळेचे सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अगदी सकाळी ७ वाजताच शाळेच्या प्रांगणात उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी ध्वजारोहणाची सर्व तयारी केली. यावेळी मुख्य अतिथी म्हणून माजी सैनिक श्री राजेंद्र शिंदे उपस्थित होते . शाळेचे मुख्याध्यापक तकटे मॅडम यांनी श्री राजेंद्र शिंदे यांचे स्वागत केले.




सकाळी नऊ वाजता माननीय श्री राजेंद्र शिंदे यांनी ध्वजारोहण केले .ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देश मेरा रंगीला , हम बच्चे यासह अनेक देशभक्तीपर गाण्यांचे व नृत्याचे नमुने सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी अतिथींनी सर्व विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले व देशासाठी आपण सदैव तयार राहिले पाहिजे असा संदेश दिला. संस्थेचे संचालक विनायक तकटे यांनी मुख्य अतिथींचे व इतर सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे आभार मानले. कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांना बिस्कीट व चॉकलेट वाटून करण्यात आला.

## पोलीस मित्र समितीतर्फे कानगाव जि. प. शाळेमध्ये खाऊ वाटप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** रक्षक संघ संलग्न पोलीस मित्र समिती महाराष्ट्र राज्य यांच्या दौंड तालुका संघातर्फे भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त कानगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये खाऊ वाटप करण्यात आला. दौंड तालुक्यातील कानगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त पहिली ते चौथी व अंगणवाडीच्या लहान मुलांना पोलीस मित्र समिती दौंड तालुका यांच्यातर्फे खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी नव्यानेच निवड झालेल्या पोलीस मित्र समिती दौंड तालुका युवती अध्यक्षा पायल अशोक गायकवाड यांना पाटस पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक जगदाळे, भोसले, के. एन. पानसरे, महेंद्र फणसे, दादासाहेब खोमणे व कानगावचे पोलीस पाटील बारवकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी पोलीस मित्र समिती दौंड तालुका अध्यक्ष गणेश वैरागे, पृथ्वीराज चव्हाण, प्रशांत धुमाळ, सुहास गायकवाड, योगेश ससाणे, समितीचे सर्व पदाधिकारी व शिक्षक वृंद उपस्थित होते.



## संक्षीप्त वृत्त

### ॲड. अजय काशिद यांची भाजपा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : सारोळा गावचे भूमिपुत्र व माजी जामखेड तालुकाध्यक्ष ॲड. अजय काशिद यांची भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे. जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी दि १३ ऑगस्ट २०२५ रोजी अहिल्यानगर येथे निवडीचे पत्र प्रदान केले. पक्षातील युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस, जिल्हा चिटणीस आणि तालुकाध्यक्ष अशा जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडलेल्या काशिद यांनी पक्षवाढीसाठी केलेल्या कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कठीण परिस्थितीत पक्षाशी एकनिष्ठ राहून मोर्चाबांधणी करण्याचे काम त्यांनी केले होते. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान आहे. नागपंचमी निमित्त श्रीनागेश्वर यात्रेत भव्य कुस्त्यांचे आयोजन, गावच्या विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग, तसेच 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' उपक्रमात जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळविणाऱ्या सारोळा जिल्हा परिषद शाळेच्या उपक्रमांचे कौतुक असे त्यांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत.

### सोमवार पासून अखंड हरीनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभान येथील श्री. विठ्ठल रूख्मिणी मंदिरात सोमवार दिनांक १८ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट दरम्यान विठ्ठल रुख्मिणी मंदिर देवस्थान व ग्रामस्थांच्या वतीने देवस्थानने नवीन बांधलेल्या सभागृहात अखंड हरीनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शांतीब्रम्ह ह.भ.प. महंत सद्गुरु भास्करगिरी महाराज व हिंदुसम्राट प.पू. महंत गुरुवर्य रामगिरी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक ह.भ.प. संगिताताई शेजूळ, श्रीमद भागवत कथा प्रवक्ते बालयोगी ह.भ.प. ऋषिकेश महाराज वाकचौरे यांच्या अधिपत्याखाली हा सोहळा संपन्न होत आहे.

ज्ञानेश्वरी पारायण सकाळी ७.३० ते ११.३०, भागवत कथा दुपारी ३ ते ६ व ६ ते ७ हरीपाठ होणार आहे. सोमवार दिनांक २५ रोजी सकाळी १० वाजता ऋषिकेश वाकचौरे महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता होणार असून किर्तना नंतर महाप्रसाद होईल तरी टाकळीभान व पंचक्रोशीतील भाविकांनी या ज्ञानामृत सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री विठ्ठल मंदिर देवस्थान विश्वस्त मंडळ, समस्त भजनी मंडळ व समस्त ग्रामस्थ टाकळीभान यांनी केले आहे.

### मॅटर एनर्जी फास्ट चार्ज नेटवर्क चे लोकार्पण आणि देशव्यापी चार्ज हब स्थापनेची योजना

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : स्वातंत्र्याचा सन्मान, भविष्याला प्रेरणा या थीमसह देश ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा करत असताना, देशातील अग्रगण्य इलेक्ट्रिक वाहन व ऊर्जा समाधान क्षेत्रातील स्टार्टअप मॅटर, प्रवासाचे स्वातंत्र्य, चार्जिंगचे स्वातंत्र्य आणि शाश्वत भविष्य निवडण्याचे स्वातंत्र्य या संकल्पनांना प्रोत्साहन देत आहे.

शाश्वत भारत घडवण्याच्या राष्ट्रीय मोहिमेशी सुसंगत राहून, मॅटर ने मॅटर एनर्जी फास्ट चार्ज नेटवर्क सुरू केले असून राइट टू चार्जिंग ची प्रतिज्ञा केली आहे. या उपक्रमांतर्गत देशभर टप्प्याटप्प्याने मॅटर एनर्जी चार्ज हब्स उभारले जातील आणि प्रत्येक दुचाकी पार्किंग ठिकाणी स्लो व फास्ट चार्जिंग सुविधा उपलब्ध करण्यासाठी ठाम प्रचार केला जाईल, ज्यामुळे चार्जिंग हे प्रत्येक रायडरसाठी एक मूलभूत नागरी हक्क बनेल.

या उपक्रमाच्या केंद्रस्थानी मॅटर ने इन-हाऊस विकसित केलेला ३ज्ञथ फास्ट चार्जर आहे, जो मॅटर एरा ला ०% ते ८०% फक्त ९० मिनिटांत चार्ज करण्यास सक्षम आहे.

### गौतम पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न

■ जनप्रवास वार्ताहार

कोळपेवाडी : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहन संस्थेचे संचालक बाबासाहेब होते यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे निरीक्षक नारायण बारे, गौतम पब्लिक स्कूलचे प्राचार्य नूर शेख, सौ सुशीलामाई काळे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.विजया गुरसळ, गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिटयूट चे प्राचार्य सुभाष भारती तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेत देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या एनसीसी व स्काऊटने शिस्तबद्ध संचलन करून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. शाळेच्या युरो किड्स च्या चिमुकल्यांनीही मागे न राहता उत्कृष्टपणे भाषणे सादर केली. शाळेच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर नृत्य सादर केले व शाळेच्या मल्लपटूंनी मल्लखांबावर विविध अविष्कार सादर करून उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.सौ. विजया गुरसळ यांनी केले.सूत्रसंचालन कलाशिक्षक गोरक्षनाथ चव्हाण यांनी तर आभार क्रीडा संचालक सुधाकर निलक यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अशोकराव काळे, संस्था विश्वस्त आ. आशुतोष काळे, सचिव सौ चैतालीताई काळे, सर्व संस्था संचालक यांनी उपस्थित विद्यार्थी, पालक व सर्वांना ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# गुहा येथील वाबळे वस्तीवरील साई मंदिरात अहिल्यानगर ते शिर्डी पायी पालखीचे स्वागत

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी फॅक्टरी : अहिल्यानगर येथील श्री साईदास परिवार ट्रस्ट यांच्यावतीने श्रावण मासानिमित्त आयोजित अहिल्यानगर ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे शनिवारी राहुरी तालुक्यातील गुहा येथील वाबळे वस्तीवरील श्री.साई मंदिरात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

गेल्या २२ वर्षांपासून अहिल्यानगर येथील श्री साई दास परिवाराच्यावतीने या पायी पालखी सोहळ्याचे आयोजन केले जाते. ५०० ते ६०० भाविकांचा सहभाग असलेल्या पालखीचे गुहातील वाबळे परिवार व साई भक्तांच्यावतीने मोठ्या आनंदाने स्वागत केले.

यावेळी साई मंदिरात पालखी दर्शनासाठी ठेवण्यात आली. आरती व भजने आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर उपस्थितांना वाबळे परिवाराच्यावतीने चहापाणी व नाश्ताची व्यवस्था करण्यात आली. यावेळी साईदास परिवार ट्रस्टचे अध्यक्ष अजय काळे, शंकर बोरुडे, निशिकांत शिंदे, संजय बनसोडे, लक्ष्मीकांत तिवारी, विजय चौधरी, प्रकाश म्हस्के यांचा



सन्मान करण्यात आला.

प्रसंगी प्रेरणा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाबळे , प्रेरणा पतसंसंस्थेचे उपाध्यक्ष मच्छिंद्र हुरुळे, प्रेरणा मल्टीस्टेटचे चेअरमन सुजित वाबळे, व्हाईस चेअरमन प्रा. वेणुनाथ लांब, प्रेरणा विकास सोसायटीचे व्हाईस चेअरमन अशोक उऱ्हे, संचालक विष्णुपंत वर्पे ,अशोक शिंदे ,राजेंद्र गांडुळे, शिवाजी उऱ्हे अशोक चंद्रे, गोपीनाथ वर्पे, चंद्रभान वाबळे, प्रा. विशाल वाबळे,प्रशांत वाबळे, सिद्धार्थ वाबळे, बंटी वाबळे, सुनील वाबळे , अनिकेत वाबळे, प्रेरणा पतसंस्थेचे जनरल मॅनेजर श्री.चंद्रे, प्रेरणा मल्टिस्टेटचे जनरल मॅनेजर अनिल वर्पे, शाखा मॅनेजर महेश सिनारे आदिंसह वाबळे व प्रेरणा परिवारातील सदस्य व साई भक्त उपस्थित होते.

## गोकुळाष्टमीनिमित्त श्रीकृष्ण व राधेच्या वेशभुषेतील विद्यार्थ्यांनी वेधले सर्वांचे लक्ष

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव :

शनिवार दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी येथील ब्लूमिंग डेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये बाळगोपाळांचा गोकुळाष्टमीचा सोहळा उत्साहात सादर करण्यात आला.

या कार्यक्रमात चिमुकले मुले मुली राधा व श्रीकृष्णच्या रूपामध्ये व पारंपरिक वेशभूषा परिधान करून दाखल झाले. विद्यार्थ्यांनी हदीहंडी फोडत हा उत्सव जल्लोषात साजरा केला.

हाथी घोडा पालखी. जय कन्हैया लाल की ! च्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमला. या सोहळ्या निमित्त संपूर्ण शाळा सजवून




रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.

कृष्णजन्माष्टमी निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी फोडणे, कृष्ण नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक डॉक्टर हितेश शर्मा यांनी यावर्षीचा गोकुळाष्टमीचा उत्सव खूप आनंददायी आणि उत्साही वातावरणात पार पडला व विद्यार्थ्यांच्या उत्साहाला दाद देत या सणाचे महत्त्व सांगून समाधान व्यक्त केले. यावेळी सर्वांना प्रसाद वाटप करून हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला.

## ७९ वा स्वातंत्र्य दिन आबासाहेब काकडे विद्यालयामध्ये उत्साहात साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगाव : तालुक्यातील आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाने ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा केला. भर पावसातही विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा उत्साह ओसंडून वाहत होता .

प्रमुख पाहुणे म्हणून आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाचे अध्यक्ष ॲड. डॉ. शिवाजीराव काकडे यांच्याहस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण झाले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड ,लक्ष्मण गाढे, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर बंधु भगिणी , पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



आपल्या प्रेरणादायी भाषणात आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाचे अध्यक्ष ॲड. डॉ . विद्याधर उर्फ शिवाजीराव काकडे यांनी स्वातंत्र्य दिनाचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले. या स्वातंत्र्य दिन महोत्सवात विद्यार्थी, पालक व शिक्षकवर्ग यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राष्ट्रीय सणाचा उत्साह द्विगुणित केला.

## श्रीराम विद्यालय ढोरजळगाव येथे स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगाव : श्रीराम माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय ढोरजळगाव येथे स्वतंत्र भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी गावातून प्रभातभेरी काढली. मुख्य कार्यक्रमात ढोरजळगावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. समिंद्राबाई साईनाथ गरड यांच्या शुभहस्ते ध्वजपूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सामूहिक राष्ट्रगीत व राज्यगीत गायन केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यालयात मान्यवरांच्या शुभहस्ते डिजिटल वर्गखोलीचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर अतिथी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या विश्वस्त, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.हर्षदाताई काकडे यांनी शुभ संदेश देताना सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या



कार्यक्रमासाठी शिक्षण विभागाच्या प्रमुख श्रीम.वंदना पुजारी, ढोरजळगाव गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. समिंद्राबाई गरड, माजी सरपंच डॉ.सुधाकर लांडे, ग्रा.प सदस्य देविदास गिऱ्हे, उपसरपंच रोहन साबळे, बाळासाहेब पाटेकर,राजेंद्र देशमुख, माजी सैनिक वसंत गिऱ्हे, दुर्योधन गिऱ्हे, दादासाहेब लबडे, पत्रकार दिपक खोसे, किरण हंबर, विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे, पर्यवेक्षिका सुरेखा शेलार, संस्था प्रतिनिधी सुरेश तेलोरे यांचेसह परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री.शिवाजी पोटभरे यांनी तर आभार राम काटे यांनी मानले.

## टाकळीभान येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान(प्रतिनिधी)'श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र दिन मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध संस्थामध्ये ध्वजाला सलामी देण्यात आली.

येथील पोलीस दुरक्षेत्रात सचिन बैसाणे, सेवा संस्थेत मंजाबापू थोरात, ग्रामपंचायतमध्ये रिपाईचे आबासाहेब रणनवरे, जि.प.प्रा.शाळेत सरपंच अर्चना रणनवरे, कृषी उत्पन्न बाजार समितीत माजी उपसरपंच भारत भवार, पोष्ट ऑफीस दिपक डुकरे, न्यु इंग्लीश स्कुलमध्ये शशिकांत गाढे, गटकळ शाळेत अशोक पारखे, लक्ष्मीवाडी शाळेत कालिंदा गायकवाड, खंडोबा वस्ती शाळेत तुषार थोरात, दाभाडे वस्ती शाळा सतीष दाभाडे आदींच्या हस्ते




ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राजकीय, सांस्कृतीक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिंगार कॅम्प पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : भिंगार हद्दीत वाकोडी फाटा या ठिकाणी बिंगो जुगार अड्ड्यावर छापा टाकून आरोपी नामे (१) मयूर प्रताप छजलानी वय ३२ .(२) नरेश रामसिंग चव्हाण वय ३५ (३) ओंकार नंदू बनसोडे वय २२ सर्व राहणार हरीमाळ दरेवाडी, सोलापूर रोड अहिल्यानगर. यांच्याकडून बिंगो जुगार खेळण्याची साहित्य व रोख रक्कम ४१,८८०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही माननीय पोलीस अधीक्षक सो. मा.अप्पर पोलीस अधीक्षक सो.अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री अमोल भारती यांच्या पथकातील पोसई. शिंदे, पोहेकॉ. सुयोग सुपेकर,पोहेकॉ. महेश मगर, पोना. हेमंत खंडागळे,पोकॉ. सागर द्वारके अशांनी सदरची कारवाई करून कॅम्प पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# पाबळला पहिल्यांदा एस.टी. बस सेवा सुरु

### ग्रामस्थांकडून चालक-वाहकांचा सन्मान

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : पारनेर तालुक्यातील पाबळ ग्रामस्थांनी केलेली मागणी पूर्ण झाली असून आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळत, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अहिल्यानगर विभागाच्या आदेशानुसार पारनेर आगारप्रमुखांनी पारनेर-अळकुटी मार्गे पाबळ अशी नवीन एस.टी. बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

ही नवी बससेवा १५ ऑगस्ट २०२५ रोजी सुरू झाली. सेवेच्या शुभारंभानिमित्त पाबळ ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत बसच्या चालक-वाहकांचा सत्कार करून त्यांचे मनापासून आभार मानले. या निर्णयामुळे प्रवाशांना सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याने गावात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामस्थांनी या उपक्रमाबद्दल आमदार काशिनाथ दाते यांचे विशेष आभार मानले. त्यांच्या प्रयत्नांमुळे पाबळ गाव तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना, कामगारांना आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, तालुका युवा उपाध्यक्ष शिवराज कदम, संतोष कापसे, राजेंद्र कवडे, भरत गोरडे, रामदास गोरडे, दिनेश कापसे, सीताभाऊ कवडे, लहू कवडे, कैलास कवडे, संतोष कवडे, नाथा कापसे, लक्ष्मण गोरडे, भाऊसाहेब गोरडे, देवराम गोरडे, अशोक गोरडे, अशोक कापसे, अनिल कापसे, किसन कवडे, साहेबराव कापसे, बाळासाहेब कापसे, योगेश




कवडे, मोहम्मद सय्यद, बाबाजी कापसे, रंजनाताई कापसे, आरती कापसे, लता कापसे, मंदा गोरडे, रेश्मा कवडे, शितल कवडे, श्रुतिका देरकर, अनिता कवडे, वृक्षा कवडे, यमुना कवडे, अलका कापसे आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# निष्काळजीपणे टेम्पो चालवल्याने अपघात; तरुणाचा मृत्यू आई वडील जखमी

■ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : निष्काळजीपणे टेम्पो चालवत टेम्पो मागे घेताना पाठीमागून आलेली दुचाकी टेम्पोला धडकून झालेल्या अपघातात दुचाकी वरील तरुणाचा मृत्यू झाला असून त्याच्याबरोबर असलेले त्याचे आई, वडील गंभीर जखमी झाले आहेत त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अविनाश प्रकाश क्षीरसागर वय २७ रा. मंचर ता. आंबेगाव असे अपघातात मयत झालेल्या तरुणाचे नाव असून त्याच्याबरोबर असलेले त्याची आई जयश्री प्रकाश क्षीरसागर व वडील प्रकाश वसंत क्षीरसागर हे जखमी झाले आहेत.



याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की दिनांक १५/८/२०२५ रोजी सायंकाळी साडेपाच वाजले च्या दरम्यान पारगाव गावच्या हद्दीत भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या बाजूला रस्त्याच्या पलीकडे असलेल्या वजन काट्यावर टेम्पो एम एच १२ एल टी ९९१३ यातील चालक हा त्याच्या टेम्पो पत्रा भरून वजन काट्यावर वजन करण्यासाठी गेला होता. काट्यावरून वजन करताना टेम्पो मागे घेत असताना त्याच्या टेम्पोला शिरूर बाजूकडून पारगाव बाजूकडे येणारी होंडा कंपनीची एम एच १४ ए बी ४९०३ ट्रकमध्ये बाहेर आलेल्या लोखंडी पत्र्याला धडकली या अपघातात ट्रक मधील पत्रा अविनाश क्षीरसागर या तरुणाला लागल्याने तो गंभीर जखमी झाला तसेच त्याच्याबरोबर असलेले त्याचे आई वडील हे देखील गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तरुण अविनाश प्रकाश क्षीरसागर याला मयत घोषित केले आहे. तर त्याच्या आईवडिलांवर उपचार सुरू आहेत. याबाबत प्रकाश क्षीरसागर यांनी पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अपघाताच कारणीभूत ठरलेल्या अज्ञात टेम्पोचालका विरोधात पारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पारगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सब इन्स्पेक्टर भाऊसाहेब लोकरे पुढील तपास करत आहे.

# बुद्धिबळातून रणनीतीचा विकास होतो – माजी मंत्री बबनराव पाचपुते

## तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचा उद्घाटन समारंभ संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : रयत शिक्षण संस्थेचे महादजी शिंदे विद्यालय , क्रीडा अधिकारी कार्यालय , श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा अंतर्गत बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना तालुक्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी सांगितले की बुद्धिबळाच्या ६४ घराच्या पटावर खेळल्यामुळे विविध अंगांनी रणनीतीचा विकास होतो.



यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक बाबासाहेब भोस यांनी बोलताना सांगितले की, बुद्धिबळाच्या विविध चालींचा उपयोग राजकीय नेतृत्वाला निर्णय घेत असताना होत असतो. म्हणजे अप्रत्यक्षरीत्या बुद्धिबळ हे राजकीय नीतीचा भाग आहे बुद्धीमबळामुळे व्यक्तिमत्त्व, मन आणि मेंदूचा तसेच भावनिक विकास होत असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी मंचावर तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे, उप प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ सुदाम भुजबळ, उपप्राचार्य डॉ नितीन थोरात, क्रीडा समितीचे उपाध्यक्ष बंटी रंधवे, सचिव संजय डफळ, सहसचिव शशिकांत उबाळे, खजिनदार महेश गिरमकर, कार्याध्यक्ष अशोक कांडेकर, तसेच क्रीडाशिक्षक रवींद्र काळाने, राजेंद्र बारगुजे, अजय जाधव, अरुण पवार, शंकर येदलोड आणि अनेक इतर क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

बुद्धिबळाच्या स्पर्धेसाठी परीक्षक अर्थात ऑर्बिटर म्हणून अतुल बोरुडे , दिपक सुपेकर, डॉ अभय शिंदे , अविनाश मोरे, विठ्ठल होले यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, सूत्रसंचालन सचिन झगडे तर आभार प्रदर्शन सुधीर साबळे यांनी केले.

### बुद्धिबळ स्पर्धेचे अनोखे उद्घाटन

श्रीगोंदा तालुक्याच्या राजकारणातील दोन दिग्गज बाबासाहेब भोस आणि बबनराव पाचपुते यांनी बुद्धिबळाच्या पटावर डाव खेळून कार्यक्रमाचे अनोखे उद्घाटन केले.

# जि.प. शाळांतील विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावेत – पोलीस निरीक्षक संजय ठेंगे

## शताब्दी वर्षानिमित्त शंभर झाडांचे वृक्षारोपण कार्यक्रम तांदुळवाडीत उत्साहात

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सध्या बिकट परिस्थितीतून जात आहेत. या शाळांमधील पटसंख्या वाढीसाठी पालकांबरोबरच ग्रामस्थांनीही पुढाकार घेतला, तर निश्चितपणे या शाळांना चांगले दिवस येतील, असे प्रतिपादन राहुरी पोलीस स्टेशनचे निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले.



तांदुळवाडी (ता. राहुरी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शताब्दी वर्षानिमित्त शंभर झाडांचे वृक्षारोपण, मान्यवर व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच गणवेश वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी लक्ष्मण पेरणे होते. यावेळी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे पुढे म्हणाले, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थी प्रत्यक्ष अभ्यासापासून दुरावले आहेत. तरीही ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळांचे महत्व आजही टिकून आहे. या शाळांनी सुजाण नागरिक घडवले आहेत. शाळेच्या शताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात आलेली शंभर झाडांचे वृक्षारोपण ही संकल्पना कौतुकास्पद आहे. तसेच शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, माजी सैनिक यांचा केलेला सन्मान ही अभिमानाची बाब आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पत्रकार विनीत धसाळ यांनी सांगितले की, एप्रिल महिन्यात शाळेला १०० वर्षे पूर्ण झाली होती. त्यावेळी माजी सैनिक, शिक्षक, राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान झाला. मात्र उन्हाळ्यामुळे वृक्षारोपणाचा उपक्रम अपूर्ण राहिला होता, जो आता पूर्ण होत आहे. या कार्यक्रमात हभप भगवान महाराज मोरे, सोसायटी सदस्य अविनाश पेरणे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. तसेच हभप भगवान महाराज मोरे (देहूकर), माजी सैनिक भैय्यासाहेब आढाव, माजी मुख्याध्यापक मच्छिंद्र कडाळी आदींसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.शाळा परिसरात ग्रामस्थांच्या सहभागातून वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडला. यावेळी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्लूमिंगडेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये १०० फुटी कायमस्वरूपी तिरंगा

## स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा उत्साहात

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : १५ ऑगस्ट रोजी ७९ वा स्वातंत्र्यदिन सोहळा ठिकठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. नारायणगाव येथील ज्ञानदा शिक्षण संस्थेच्या १४ नंबर स्थित ब्लूमिंगडेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये १०० फुट उंचीचा तिरंगा झेंडा उभारून ध्वजारोहण करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांनी ध्वजपूजन व ध्वज मानवंदना देऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी

महाराष्ट्रातील सर्वात उंच ध्वजाला शाळेच्या शिष्टाचाराने आणि अभिमानाने वंदन केले.





विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य, गीते, स्केटिंग नृत्य, प्रतिभासंपन्न भाषणं सादर केली. नेतृत्व आणि जबाबदारीचे प्रतीक असणारा विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ शिस्तबद्धपणे पार पडला .

कार्यक्रमाचे अध्यक्ष देवेंद्र शहा यांनी आमच्या काळात ह्या संधी अकल्पनीय होत्या,ही शाळा खरोखरच भविष्य घडवत आहे, असे सांगून येथील सोयी सुविधांचेही कौतुक केले.

माजी आमदार व शाळेचे अध्यक्ष अतुल बेनके यांनी मजबूत, सक्षम भावी पिढ्यांसाठी त्यांचे मनापासूनचे संकल्प सांगितले.

तालुक्यातील शिवनेरी माजी सैनिक संघटना शाळेच्या विद्यार्थ्यांसोबत परेड मध्ये सहभागी झाले.

याप्रसंगी यू मुंबा स्टार्स कबड्डीपटू संदीप सिंग,प्रो कबड्डी खेळाडू अजित चौहान,संदीप कुमार, इतर मान्यवर उपस्थित राहिल्याने शाळेच्या खजिनदार गौरीताई बेनके, जुन्नर तालुका औद्योगिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष अमित बेनके, डी.डी. डोके, विनायक तांबे यांनी त्यांचे स्वागत केले.

विविधतेमध्ये एकता आणणाऱ्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन क्रीडा शिक्षक नवनाथ भालेराव यांनी केले.यानिमित्ताने सर्वांना खाऊ वाटप करून कार्यक्रम संपन्न झाला .

# प्राईड ॲकेडमी मध्ये स्वातंत्र्यदिन जल्लोषात साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : पंचायत समितीच्या माजी सभापती व प्राईडच्या संस्थापिका डॉ. वंदनाताई मुरकुटे व माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर (माऊली) मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली भेर्डापूर–वांगी येथे सुरु असलेल्या प्राईड ॲकेडमी इंग्लिश मेडीअम स्कूल ॲन्ड ज्युनि. मध्ये प्राईड ॲकेडमीमध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

भारतीय युवक कॉंग्रेसच्या सचिव तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा दिपाली ससाणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष लकी शेठी, अशोकनगर येथील डॉ. सारिका कुंदे, भेर्डापूर च्या डॉ. माया कवडे, त्रिवेणी गोसावी आदी मान्यवर, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाने जारी केलेल्या नियमांचे पालन करत देशभक्तीपर गाण्यावर मुलांनी कवायत प्रकार सादर केले. विद्यार्थ्यांनी पथ संचलन करून ध्वजाला सलामी दिली. लहान मुलांनी देशभक्तीपर भाषणे केली.

मी १० वर्षापूर्वी पाहिलेला प्राईडचा हा वटवृक्ष बहरला आहे. या वृक्षाला शाखा आल्या आहेत. दिवसेंदिवस हा वटवृक्ष असाच बहरत राहावा यातून आयपीएस, इंजिनिअर, मोठे अधिकारी घडतील याची मला खात्री आहे, असे प्रतिपादन दिपाली ससाणे यांनी केले .



यावेळी डॉ. कुंदे म्हणाल्या की ग्रामीण भागात डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्यामुळे दिले जाणारे आदर्शवादी व दर्जेदार शिक्षणाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती ही वाखाणण्याजोगी आहे. तसेच लकी सेठी यांनी शाळेच्या कामाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. शाळा स्तरावर झालेल्या निवडणुकीतील विजयी उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते बॅजेस वितरण करून त्यांचा शपथग्रहण विधी पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थीनी अदिती हापसे व तेजल निर्मळ यांनी केले. शाळेचे क्रीडा शिक्षक प्रदीप गोराणे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जांबूत येथे कैवारी फाउंडेशनच्या वतीने ७९ वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीच्या जल्लोषात साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

जांबूत : देशभरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू असताना, १५ ऑगस्ट २०२५ रोजी जांबूत येथे कैवारी फाउंडेशनच्या वतीने ७९ वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीच्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता ध्वजारोहण सोहळ्याने झाली. पुणे पिंपरी पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले , पोलिस ईश्वर भोसले, पोलीस मनोहर खराडे यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला. राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि घोषणाबाजीने वातावरण देशभक्तीच्या भावनेने दुमदुमले. यानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले तसेच विविध देशभक्तिपर भाषणे सादर करण्यात आले.

या सोहळ्यास पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, पोलीस ईश्वर भोसले, पोलीस मनोहर खराडे ,कैवारी फाउंडेशन अध्यक्ष फुलसिंग मावळे,उपाध्यक्ष कचर गायकवाड, विजय संभेराव, नवनाथ पवार , कुन्सुल भोसले , सुभाष सोनवणे ,सुदाम साबळे, कैलास कांदळकर, रवींद्र मेरगळ, दादाभाऊ मुसळे, बाळशीराम बर्डे,शुभम गायकवाड, मयूर खराडे, अरुण भोसले, अमोल मेहेर, स्वप्निल थोरात, संदेश गायकवाड आदी मान्यवरांसह अनेक नागरिक उपस्थित होते.

शेवटी आभार प्रदर्शन करून सर्व उपस्थितांना खाऊ वाटप करण्यात आले. देशभक्तीच्या गाण्यांच्या तालावर कार्यक्रमाची सांगता झाली. हा सोहळा कैवारी फाउंडेशनच्या सेवाभावाची आणि एकतेची झलक दाखवणारा ठरला.

# रानभाज्या आरोग्यासाठी निसर्गाने दिलेली अमूल्य देण : आ. आशुतोष काळे

## रानभाज्या महोत्सवाचे आ.आशुतोष काळेंच्या हस्ते उद्घाटन

■ जनप्रवास वार्ताहार

कोळपेवाडी : तहसील कार्यालय कोपरगाव येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त तहसीलदार महेश सावंत यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी आ. आशुतोष काळे यांनी उपस्थित राहून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. यावेळी त्यांच्या हस्ते महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने आयोजित रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आ.आशुतोष काळे म्हणाले की, ग्रामीण भागातील पारंपरिक अन्न संस्कृती जपण्यासाठी तसेच आरोग्यदायी, पोषक आणि नैसर्गिक आहाराचा प्रसार करण्यासाठी रानभाज्या महत्त्वपूर्ण असून रानभाज्या आपल्या आरोग्यासाठी निसर्गाने दिलेली अमूल्य देण असल्याचे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले. पुढे बोलताना ते म्हणाले, आधुनिक जीवनशैलीत रानभाज्यांचा आहारात समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे आरोग्य, पोषण आणि परंपरा जपल्या जातात. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीला आपल्या वारशाची ओळख मिळते. याप्रसंगी या महोत्सवात स्थानिक महिला बचतगट, शेतकरी व स्वयंसेवी संस्थांनी स्टॉल लावून विविध पारंपरिक रानभाज्या, त्यांचे पोषणमूल्य, उपयोग व स्वयंपाक पद्धतीचे सादरीकरण करत सहभाग घेतला. याप्रसंगी तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, कोपरगाव शहर पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार, कोपरगाव ग्रामीण पोलीस निरीक्षक संदीप कोळी, कृषी विभागाचे अधिकारी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्हावरे येथे ''श्री छत्रपती शिवाजी महाराज'' महाराजसस्व समाधान शिबीर

■ जनप्रवास प्रतिनिधी

न्हावरे : नागरिकांच्या महसुली कामांना गती देण्यासाठी आणि त्यांच्या अडचणी जागेवरच सोडवण्यासाठी शिरूर तालुक्यातील न्हावरे येथे सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह न्हावरे या ठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हे शिबिर पार पडेल.

या शिबिरात विविध शासकीय योजनांची माहिती दिली जाईल आणि नागरिकांना त्यांचा लाभ घेता येईल. यासोबतच, नागरिकांच्या महसुली आणि इतर तक्रारींवर तात्काळ तोडगा काढला जाणार आहे. प्रमाणपत्र, नोंदी आणि विविध सरकारी अर्जाची पूर्तता करण्याची सुविधाही येथे उपलब्ध असेल.

या शिबिरामुळे सर्व कामे एकाच ठिकाणी होणार असल्याने नागरिकांची वेळ आणि श्रम वाचणार आहेत. महसूल विभागाच्या या उपक्रमामुळे नागरिक थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधू शकतील, ज्यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता येईल. महसूल विभाग , कृषी विभाग व इतर सर्व शासकीय विभागामार्फत नागरिकांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहनकरण्यात आले आहे.

# लिट्ल एंजल्स स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : येथील स्व आप्पासाहेब धनवटे मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित लिट्ल एंजल्स स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

मेजर .गौरव अनिल नळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीने ओतप्रोत विविध प्रात्यक्षिके, सांस्कृतिक सादरीकरणे आणि भाषणे सादर करून सर्वांची मने जिंकली.त्यांच्या डोळ्यांत झळकणारा उत्साह आणि देशासाठी असलेले प्रेम पाहून मन अभिमानाने भरून आले.

१३ ऑगस्ट १४ ऑगस्ट रोजी स्कुल मध्ये विविध कार्यक्रम घेण्यात आले स्वच्छतेसाठी अभियान घेण्यात आले. विद्यार्थांना नाविन्य पूर्ण कवायत करून व्यायामाचे म्हत्व सांगण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांना परेड घेऊन देश सेवा महत्वाच्या गोष्टी साठी मार्गदर्शन करण्यात आले. ललित चित्र कला स्पर्धा घेण्यात आली. खेळाचे सामने घेण्यात आले तसेच देश भक्तीपर कार्यक्रम व भाषण घेण्यात आले. विविध पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाचे विशेष अतिथी लेखक अंतः अस्ति प्रारंभः श्री.वैभव ढूस यांनीही आपल्या भाषणातून स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या कार्यक्रमात शाळेचे संस्थापक चेअरमन डॉ. श्री धनंजय धनवटे, अध्यक्ष श्री.दीपक धनवटे,उपाध्यक्ष श्री.दीपक नाईक, विश्वस्त डॉ. सौ.धनश्री धनवटे,श्री.मनोज धनवटे ,श्री.राहुल धनवटे,संचालिका सौ.वैजयंती धनवटे, उपमुख्याध्यापक श्री. सुरेश पटारे आदी उपस्थित होते.

दरम्यान, गावातील सर्व शाळा येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न झाला सार्वजनिक कार्यक्रमाचे ध्वजारोहण सरपंच स्वाती पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

# अशी असावी कामाच्या ठिकाणी वागणूक



कामाचं ठिकाण अर्थात ऑफिसमधील वातावरण शांत, खेळीमेळीचं आणि उत्साहवर्धक असेल तर कर्मचाऱ्यांनाही काम करायला उत्साह येतो शिवाय उत्पादन क्षमताही वाढते. म्हणूनच ऑफिसमधील वातावरण उत्तम असावं व कर्मचाऱ्यांचे एकमेकांशी उत्तम संबंध प्रस्थापित व्हावेत, याकरता हे कानमंत्र...

**दृढता आणि शांत वृत्ती**

बऱ्याचदा अशी स्थिती निर्माण होते की, तुम्हाला तुमचं मत व्यक्त करायचं असतं. एखाद्या छोट्या गोष्टीत किंवा मोठ्या निर्णयात तुम्हाला तुमचं मत मांडायचं असतं; पण कधीही घाई करु नका. पहिल्यांदा आजूबाजूची परिस्थिती समजून घ्या आणि मगच शांतपणे, संयम शब्दात तुमचं मत मांडा.

**संयम गरजेचा :** स्वतंत्र मतांमुळे, काम करण्याच्या भिन्न प्रवृत्तीमुळे काही वेळेस वादाचे प्रसंग निर्माण होतात; पण अशा परिस्थितीत वाद न वाढवता आणि स्वत:चाच मुद्दा खरा हा बाणा सोडून दुसऱ्याचं म्हणणं ऐकून घ्यायला हवं. कोणत्याही परिस्थितीत संयम सोडता कामा नये.

**व्यक्तीगत टीका टाळा :** गमतीमध्ये असो किंवा गंभीरपणे वार्तालाप, चर्चा, मिटिंग या ठिकाणी बोलताना शब्दांचा वापर अधिक संयमाने, विचारपूर्वक करा. सर्वांसमक्ष व्यक्तीगत टीका टाळा. वादाची परिस्थिती निर्माण होईल, अशी कोणतीच गोष्ट करु नका.

**गैरसमज करून घेऊ नका :**

दुसऱ्याविषयी, त्यांच्या स्वभावाविषयी विनाकारण गैरसमज करुन घेऊ नका. तुम्हाला एखाद्याविषयी शंका असेल तर विनंतीपूर्वक, प्रेमाने त्यांना विचारा; पण उगाचच मनात अडी करुन घेऊ नका. ऐकीव गोष्टींवर विश्वास ठेवू नका.

**शत्रुत्व बाळगू नका**

काही लोकांना इतरांशी जमवून घ्यायला मैत्री करायला आवडत नाही त्यामुळे विनाकारण त्यांच्या नातेसंबंधांमध्ये विचारांचा जन्मही त्यातूनच होतो आणि मग हळूहळू, दु:ख असंतोष यांचा जन्म होतो. म्हणूनच सगळ्यांनी मित्रत्वाचे संबंध ठेवा.

**निंदा टाळा**

कोणाच्याही अनुपस्थितीत एखाद्याची निंदा करणं, नावं ठेवणं, व्यंगावर बोट ठेवणं ही अत्यंत चुकीची आणि वाईट सवय आहे. म्हणूनच सवय सोडणं किंवा जे काही बोलायचं आहे ते समोर बोलणं केव्हाही उत्तम चुगलखोरीसुद्धा टाळा.

**रडू नका :** अनेकदा आपलं म्हणणं मांडताना स्त्रियांना रडू येतं, त्या भावूक होऊन जातात; पण सदैव तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवायला शिका.

# स्वत:मधील बदलासाठी द्या फक्त दहा मिनिटे

स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यासाठी मोठे काम किंवा जास्त वेळ देण्याची आवश्यकता नाही. दहा मिनिटांच्या वेळातही तुम्ही स्वत:मध्ये बदल घडवून आणू शकता. तुम्ही हे करून पाहा..

✻ जवळचा मित्र किंवा जी व्यक्ती तुम्हाला आवडते, त्यांच्यासाठी थँक यू नोट तयार करा. तुमचा हा प्रयत्न ते आयुष्यभर लक्षात ठेवतील.

✻ घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींबरोबर फोटो अल्बम पाहा. असे केल्यामुळे तुम्ही काही वेळातच तुमच्या आयुष्यात आनंदाचे क्षण पेरू शकाल.

✻ झोपण्यापूर्वी कोमट पाण्याने स्नान करा. हे थोडेसे विचित्र वाटेल, परंतु अमेरिकेतील एका अध्ययनानुसार, ज्या रुग्णांच्या बेडवरून तलाव किंवा नदीसारख्या नॅचरल वॉटर बॉडी दिसतात, त्यांच्या प्रकृतीमध्ये ३० टक्के जास्त झपाट्याने सुधारणा होते. पाण्यामध्ये हिलिंग इफेक्ट असतो.

✻ शरीराला कोणत्या ना कोणत्या कामात व्यस्त ठेवा. उड्या मारा, इकडे-तिकडे फिरा, आवडीच्या संगीतावर नाचायला लागा. त्यामुळे तुम्ही सुदृढ राहाल. दीर्घकाळापर्यंत सुंदर व स्वस्थ जीवन जगण्याचा मार्ग सुकर होईल.

✻ झोपण्यापूर्वी दहा मिनिटे आधी तुमची आई, मित्र किंवा जवळच्या सदस्याबरोबर वेळ घालवा. त्यांना त्या दिवसभरातील महत्त्वाच्या सर्व गोष्टी सांगा. असे केल्याने तुम्हाला शांत झोप लागेल.

✻ मुलांचे 'शॉर्ट अटेंशन प्लॅन' असतात. उदा. दिवसभरात मस्ती करायची म्हणून ते एखाद्या मोठ्या सदस्यांबरोबर खेळतात. मुलांसोबत खेळल्याने तुम्ही तुमच्यातील मुलाशी जोडले जाल.

✻ एखाद्या ठिकाणी कुठेही एकटेच बसा. त्यामुळे तुमच्या भावनांना वाट मोकळी होईल. डोक्यात सुरू असलेल्या विचारचक्राची अनुभूती घ्या. मन आणि मेंदू स्वच्छ केल्याने नवीन ऊर्जा संचारते.

✻ गंभीर विषयाच्या परिणामांच्या गृहितांची कल्पना करा.

एका अध्ययनानुसार एखाद्या गोष्टींच्या गृहितांची कल्पना केल्याने विचार करण्याची शक्ती वाढते. अमेरिकी डॉक्टर रुग्णांना अशाच कल्पना करायला लावतात. त्यामुळे त्यांना काही वेळात चांगले वाटू लागते.

■■■

# घराची शान, शोभा वाढविण्यासाठी पडद्यांचा वापर करावा



घराची शान, शोभा वाढवण्यासाठी घरातील दारा-खिडक्यांवर, जाळ्यांवर पडदे लावले जातात. पडद्यांमुळे घरात धूळ-माती येत नाही आणि घर स्वच्छ असते. तसेच पडद्यांच्या रंगांचा परिणाम डोळ्यांना, मनाला प्रफुल्लित करतो. हिवाळ्यात जाड पडदे वापरावेत तर उन्हाळ्यात पातळ पडदे. दर सहा महिन्यांनंतर आलटून पालटून पडदे घरात लावल्यास घरात नावीन्य येते.

♦ लांब पट्ट्यांचे पडदे खोलीला भव्य लुक देतात, तर तिरक्या पट्ट्यांचे पडदे खोलीची उंची कमी दर्शवतात. फुलापानांच्या वा इतर डिझाइन्सचे पडदे तर खोलीच्या सौंदर्यात खूपच भर घालतात जास्त महागडे पडदे खरेदी करू नयेत.

♦ पडदे लावण्याची पद्धत घराला नावीन्य देते. पडदे सरळ हुक लावून वा चूण घालून लावले जातात. बऱ्याचदा वर चूण घालून लांबट वा तिरकेही पडदे लावले जातात. हल्ली छतापासून फरशीपर्यंत लांब पडदे लावण्याची फॅशन आहे.

♦ भिंतीच्या रंगाला अनुरूप पडदे लावणे उत्तम असते.

♦ पडदे खाली जमिनीला स्पर्श करणारे नसावेत अन्यथा ते लवकर खराब होतील.

♦ दर दोन महिन्यांनंतर पडदे अवश्य धुवावेत किंवा व्हॅक्यूम क्लीनरद्वारे त्यांच्यातील धूळ साफ करावी. यामुळे पडद्यांत जंतू इ. निर्माण होणार नाहीत.

♦ पडद्याचे कापड सुती वा रेशमीही असू शकते. जाळीचे पडदे हलके वाटतात.

♦ जर घरी जुन्या साड्या असतील तर त्यांचेही पडदे बनवून बचत करू शकता.

♦ पावसाळ्यात पडदे, जमिनीपासून उचलून ठेवावेत जेणेकरून ते ओले होणार नाहीत. ओले झाल्यास सुकवावेत अन्यथा घरात दुर्गंधी पसरेल.

♦ पडद्यांच्या रंग-रूपाला साजेसे बेडशीटच असावेत. जर पडदे मल्टीकलर असतील तर वेगवेगळ्या रंगांची बेडशीटस वापरू शकता.

♦ किचनमधील पडदा गॅसपासून दूर लावावा.

♦ पडदे लावण्यासाठी पूर्वी पॅलमेट लावत ज्यात लाकडी वा सनमायकाच्या फिटींगचा खर्च वाढत असे परंतु हल्ली हुक लावून रंगीबेरंगी रोड लावले जातात जे स्वस्त पडतात.

पडदे लावण्यासाठी प्लॅस्टिक ऐवजी ॲल्युमिनीयम रोड लावल्यास पडद्याच्या रिंगा सहजतेने सरकतात.

# पती-पत्नीचं सहजीवन एक गुलाबी कोडं



पती-पत्नीचं सहजीवन एक गुलाबी कोडं, तडजोड, समाजाशी सहकार्य व यशस्वी सहचर्य यावरच आधारलेलं असतं. या सहजीवनात दोघांनी एकरूप व्हायला हवं. कोणत्याही स्त्रीला नवऱ्यानं दुबळं असणं आवडणारं नसतं, म्हणूनच ती त्याच्यामागे खंबीरपणे उभी असते किंवा पंप बनून पतीला अधिक 'क्रियाशील' बनवते.

पती-पत्नीमध्ये घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा परिणाम दांपत्य जीवनावर होत असतो. विवाहादरम्यानच पतीचे करिअर सुरू झालेले असते. करिअर करणं, घडवणं म्हणजे अक्षरशः अग्नीदिव्य असते. त्याला अनेक संकटांना सामोरे जावे लागत असते.

अशावेळी पत्नीने अनावश्यक खरेदी, हौसमौज बाजूला ठेवून काटकसरीने वागावे व पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. पत्नी समंजस व सहकार्य देणारी असेल, तर पतीलाही उमेद येते. आपला पती करिअरमध्ये यशस्वी ठरला, तर त्याच्या यशाचा, त्याच्या धनसंपदेचा, त्याच्या ऐश्वर्याचा उपभोग पत्नीलाच मिळणार असतो. त्यासाठी थोडे दिवस काटकसरीने व आहे त्यात समाधाने काढावेत. पत्नी जर शहाणी असेल, तर ती नवऱ्याला कधीच नाउमेद करणार नाही किंवा तुम्हाला त्या कामात अपयश आलं तर आपलं कसं होणार हो ? तुम्हाला एवढं कळत नव्हतं. का ? कशाला नको त्या उपद्व्यापात पडलात हो ? आता तुम्ही निस्तरा असे उन्मळून टाकणारे उद्गार काढू नयेत. आपला नवरा म्हणजे हजाराची नोट आहे व ती मी मोडणार नाही असे मनाशी ठरवून वागवतात. म्हणजे पतीची किंमतही राहाते आणि त्याची उमेद न मोडल्याने तो खचला जात नाही. काही स्त्रिया आधीच नकारघंटा वाजवत, 'मी माझे दागिने तुमच्या धंद्यासाठी मोडणार नाही हो, सांगून ठेवते.' किंवा आहे ती चटणी - भाकरी खात राहू. अंगलट आला धंदा तर काय करणार आपण ? असे म्हणून तिथंच खुरडत संसार करून राहतात व नवऱ्याचे धाडसच मोडून काढतात; पण असा विचार करत नाहीत की, जाऊ देत दागिने... बघू काय होतंय. पती जर धंद्यात बुडू लागला, तर मी लक्ष घालीन त्यात. काही स्त्रियांना संसार कडेला असे लागले आहेत की पिढ्यान् पिढ्यान् त्यांचे नाव निघते. तर काही स्त्रियांनी आपले संसार असे बुडवले की, किनारासुद्धा त्यांना ओळख दाखवत नाही. पतीचा आनंदोत्कर्ष, समाधान यातच पत्नीचे कर्तव्य लपलेले असते.

■■■

# फुले टवटवीत राखण्याचे गुपित

फुले फक्त सुगंधच देत नाहीत, तर घराची शानही वाढवतात. घरातील व्यक्तींना आपल्या प्रमाणेच प्रफुल्लित ठेवतात. जेव्हा आपण फुले फ्लॉवरपॉटमध्ये सजवून सर्वांची सहज नजर जाईल अशा जागी ठेवतो तेव्हा ती फुले पाहणाऱ्यांना प्रसन्नता व आनंद मिळतो. फ्लॉवरपॉटमधील फुले दीर्घकाळ टवटवीत राहाण्यासाठी खालील दक्षता घ्या-

० लवकर कोमेजत नाहीत अशाच फुलांची निवड करा.

० फुले पहाटे वा सायंकाळी तोडा व तोडतानाच त्या रोपांना पाणी घाला.

० फ्लॉवरपॉटमध्ये शेवाळे साचू नये यासाठी त्याच्या तळाशी थोडेसे पॅराफिन ऑइल वा ॲल्युमिनियम पत्रा टाका.

० दोन लहान चमचे साखर व व्हिनेगार एकत्र मिसळून फ्लॉवरपॉटच्या पाण्यात मिसळल्ल्यास फुले बरेच दिवस टवटवीत राहतात.

० जेथे ऊन, उष्ण हवा वा कोंदटपणा असेल अशा जागी कधीही फ्लॉवरपॉट ठेवू नये. फक्त थंड जागीच फ्लॉवरपॉट ठेवल्यामुळे त्यातील फुले जास्त काळ फ्रेश राहातात.

० फुलांच्या डहाळ्याचा कुजलेला भाग कात्री छाटा छाटताना त्यात अळी-कीडा घुसलेला नाही ना ते पाहा.

० फुलांच्या डहाळ्या धारदार कात्री वा चाकूने तिरक्या कापा. त्यामुळे त्या जास्त पाणी शोषू शकतील.

० रोज पाणी बदलण्याचा त्रास टाळायचा असेल, तर २५० मि. ली. पाण्यात एक औंस हायड्रोजन सल्फेट मिसळा. हे मिश्रण दहा लिटर पाण्यात मिसळू शकता. फ्लॉवरपॉटमध्ये पाणी भरून २ चमचे मिश्रण मिसळा.

# सौंदर्य उजळविण्यासाठी काही घरगुती टिप्स



सौंदर्य उजळविण्यासाठी नेहमी कॉस्मेटिक्सचा वापर करावा असे नाही. पूर्वीच्या काळी घरातच उपलब्ध होणारी सौंदर्य प्रसाधने, काळी माती, ताक, हळद, फळांचा रस, मुलतानी माती यांचा उपयोग करीत असत. या वस्तू आजही सहज उपलब्ध होतात. तसेच त्या उपयोगीही आहेत.

बाजारातील सोंदर्य प्रसाधने महागडी असतात. त्याची खरेदी परवडण्यापलिकडे असते. अशा वेळी स्वस्तात मिळणारी सौंदर्य प्रसाधने खरेदी केली जातात, पण त्यामुळे फायदा होण्यापेक्षा नुकसान होण्याचीच शक्यता अधिक असते.

त्यामुळे अशा परिस्थितीत घरच्या घरी तयार होणारी सौंदर्य प्रसाधने एक अनोखे सौंदर्य प्रदान करीत असते, हे सत्य नाकारता येत नाही. कारण ही प्रसाधने स्वस्त, शुद्ध आणि नैसर्गिक गुण असणारी आहेत. त्याचा वापर तुम्ही नि:संकोच करू शकता....

क्लिंजर

चार चमचे दही व एक-दोन चमचे लिंबाचा रस एकत्र करून घ्या. कापसाच्या साहाय्याने चेहरा व मानेला खालून वरच्या दिशेला लावा आणि नंतर कापसाने पुसून घ्या. हे तेलकट तवचेसाठी चांगले क्लिंजर आहे.

ॲस्ट्रिंजेंट

चार चमचे काकडीचा रस व दोन चमचे गाजराचा रस व्यवस्थित मिक्स करून घ्या. हे फ्रेशनचे काम करते.

हँड एण्ड बॉडी लोशन

गुलाब जल, दोन चमचे ग्लिसरीन, अर्धा चमचा सिरका, अर्धा चमचा मध, व्यवस्थित मिक्स करून एका बाटलीत भरून ठेवा. स्नानानंतर हात आणि संपूर्ण शरीरावर लावा. त्याने त्वचा स्वच्छ आणि मुलायम बनते.

डेअर डाय

एक लीटर पाण्यात आवळा २५ ग्रॅम, ब्राह्मी बुटी ५५ ग्रॅम चोवीस तास भिजवून ठेवावे. एक किलो तिळाच्या तेलात हे पाणी हाताने एकजीव करा आणि गाळून तेलात टाकून इतके गरम करा की पाण्याची वाफ होऊन त्यातील पाण्याचा अंश नाहीसा होईल.

तेल थंड करून बाटलीत भरून ठेवा. त्याव्यतिरिक्त रोज रात्री एक-एक चमचा आवळा, हरडा आणि बेहेडा ७५० मिली पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी याच पाण्याने केस व्यवस्थित धुवा. हे एक चांगले गुण असणारे हेअर डाय आहे.

# मूळव्याध आणि होमिओपॅथिक उपचार

गुदद्वाराच्या आतील भागास असलेल्या अशुद्ध रक्तवाहिन्यांचे सूक्ष्म जाळे तेथील आंतरवर्णासह सैल सुटते त्या वेळी हाताला कसला तरी कोंब किंवा मोड लागतो. बऱ्याचदा यामध्ये वेदना व रक्तस्राव प्रकट होतो. या स्थितीलाच मूळव्याध असे म्हणतात. मूळव्याधीचे दोन प्रकार करण्यात आलेले आहेत. १. आंतर मूळव्याध व २. बाह्य मूळव्याध. मोड किंवा अंकुर किंवा व्रण गुदद्वाराच्या आतील भागात निर्माण झाले असतील तर त्याला आंतर मूळव्याध असे म्हणतात. हेच अंकुर जेव्हा आणखी खाली सरकून गुदद्वाराच्या बाहेर येतात तेव्हा त्याला बाह्य मूळव्याध, असे म्हणतात. एकाच व्यक्तीला वरील दोन्ही प्रकारचा त्रास असू शकतो.

मूळव्याधीची लक्षणे : मलत्यागाच्या वेळी जळजळणे, वेदना होणे आणि रक्तस्राव होणे हे या आजाराचे प्रारंभिक लक्षण होय. याशिवाय मलाच्या वरील भागावर लालसर रेषा प्रकट होणे, थेंब थेंब रक्त पडणे, मलाशयातून रक्तस्राव होऊन ॲनिमिया निर्माण होणे इत्यादी लक्षणे प्रकट होतात.

योगासने व व्यायाम : योगासने ही मूळव्याधीवर अतिशय उपायकारी व्यायाम पद्धती आहे.

रोज सकाळी २-३ किलोमीटर चालणे. सकाळ-संध्याकाळ सर्वांगासनाच्या स्थितीमध्ये राहून सायकल चालवण्यासारखा व्यायाम करावा. या उपचाराने पूर्णपणे मूळव्याधी बरी झाली असता नैसर्गिक जीवन पद्धतीची कास सोडू नये.ऑपरेशनच्या नावाखाली मूळव्याधीला जाळण्याचे व कापण्याचे प्रयोग चालतात. यामुळे वरवर फायदा निश्चितच दिसून येतो, परंतु चुकीच्या आहाराविहारात सुधारणा न केल्याने मोठ्या आतड्याचे इतर विकार उद्भवतात. दुसरे विकार होऊ नयेत म्हणून ऑपरेशननंतरही नैसर्गिक उपचार पद्धती अमलात आणली पाहिजे.

आहार चिकित्सा व उपचार : रोज १०-१२ ग्लास पाणी प्यावे. हिरव्या पालेभाज्या जास्त आहारात असाव्यात. चिकन, मटन, मसाल्याचे पदार्थ, तेलकट, बाजरीची भाकर, जास्त गरम पदार्थ टाळावेत. ओवा, जंगली ओवा, खुरासणी ओवा यांचे बारीक चूर्ण करून थोड्याशा लोण्यात कालवून सकाळ-संध्याकाळ मूळव्याधीच्या फोडांवर लावावे. वरील उपायांनी आराम पडत नसेल तर चिकित्सकांकडून इलाज करणे आवश्यक ठरेल.

होमिओपॅथिक उपचार : होमिओपॅथिक नैसर्गिक उपचार पद्धती आहे. यापासून कोणतेही दूष्परिणाम होत नाही. रुग्णाचा सर्वांगीण अर्थात शारीरिक आजाराचा व मानसिकतेचा अभ्यास करून रुग्णाला औषध दिले जाते.

# मुलं आईच्या गर्भातही शिकतात!



हल्ली 'पुराणातील वांगी पुराणात' असे म्हणण्याची एक फॅशनच आली आहे. स्वत:ला आधुनिक, पुरोगामी, विज्ञाननिष्ठ वगैरे म्हणवून घेण्यासाठी अनेक 'विचारवंत' प्राचीन ग्रंथांमधील वर्णनांची यथाशक्ती टर उडवत असतात. गर्भातील बाळही अनेक गोष्टी शिकत असते, असे आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये म्हटले आहे. त्याची व 'गर्भसंस्कार' वगैरे प्रकारांचीही अनेकांनी स्वत:च्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे टर उडवली होती. मात्र आता गर्भातील बाळाबाबतचे प्राचीन वर्णन खरेच असल्याचे अमेरिकेतील पॅसिफिक लूथरान युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी दाखवून दिले आहे. या संशोधकांनी म्हटले आहे की, आपल्या आईच्या पोटात असतानाच बाळ आईची भाषा शिकण्यास व तिला स्वीकार करण्यास सुरुवात करतो.

अगदी उच्चारांच्या बारकाव्यासहित ते भाषेचे ग्रहण करीत असते. रॉकलंड हॉस्पिटलच्या डॉ. वंदना केंट यांनी म्हटले आहे की, मुलांसाठी सकारात्कमक अनुभव अतिशय महत्त्वाचा असतो. त्यामुळेच गर्भवती महिलांना चांगली पुस्तके वाचणे, सकारात्मक गोष्टी ऐकवणे याचा सल्ला दिला जातो. मुलांचा जन्म झाल्यानंतरही त्यांना असेच संस्कार घडवल्यास त्यांची वृत्ती सकारात्मक होते. मात्र, हे संकेत त्यांनी जन्मपूर्वीच पकडलेले असतात.

# आजही कोठे ना कोठे पुरुषीपणा आडवा येतो



स्वत:विषयी वा आपल्या स्वातंत्र्याविषयी विचारच करीत नसत. त्यांना पतीविषयी कोणतीही तक्रार नसे. परंतु शिक्षणाने त्यांच्यात जागृती आली आहे. आज त्या त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देणाऱ्या तरूणांनाच पसंत करतात. जादा अडवणूक केलेली व खर्चावर बंधने घातलेली त्यांना रूचत नाही. आपल्या पतिराजाने वा मित्राने आपल्या फॅशनबद्दल आपेक्ष घेऊ नये, उलट आपल्या नव्या हेअर स्टाइलचे वा फॅशनचे त्याने कौतुक करावे अशी त्यांची अपेक्षा असते. बदलत्या ट्रेंडसोबत राहणारे तरूण हल्लीच्या तरूणींना जास्त आवडतात. त्यांनी त्यांच्यासाठी योग्य शॉपिंग करावी त्यांना फॅशनेबल वस्तू खरेदी करून द्याव्यात अशी त्यांची अपेक्षा असते. हल्लीच्या तरूणी ज्वेलरीपेक्षा ट्रेंडी कपडे, घड्याळे व मोबाइलवर जास्त खर्च करतात. त्यामुळे त्यांना या वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य देणारा जोडीदार हवा असतो. तरूणींना त्यांच्या यशाचा मत्सर करणारे तरूण आवडत नाहीत. त्यांच्या आनंदात सहभागी होणारे तरूण त्यांना जास्त पसंत असतात. आता तरूण आपल्या पत्नीला चार भिंतीत कोंडून ठेवू शकत नाही. बदलत्या काळानुसार महिलेप्रमाणेच पुरूषांचा दृष्टिकोनही बदलला आहे. आता महिला पूर्वीपेक्षा खूपच स्वावलंबी आणि दृढनिश्चयी झाल्या आहेत. त्या आपल्या जीवनाला व करियरला एक नवी दिशा देऊ इच्छित असतात. त्यामुळे त्यांना चूल-मुलाच्या बंधनात अडकून राहणे आवडत नाही. घराच्या जबाबदारी सोबतच ती आपले करियरही उजळू पाहात असते; परंतु आजही कोठे ना कोठे पुरूषीपणा आडवा येतच असतो. काहीही असले तरी बदलत्या काळाने तरूणींचे विचार पूर्णपणे बदलले आहेत हे मात्र खरे. काही बाबी वगळता त्या प्रत्येक कामात पुरूषांची बरोबरी करायला घाबरत नाहीत. ज्याचे विचार जुने बुरसटलेले नसून आधुनिक आहेत असाच जोडीदार त्यांना हवा असतो.

# भाज्या ताज्या राखण्यासाठी काय कराल

रोज सकाळी उठून मंडईतून ताज्या भाज्या आणणे नेहमीच शक्य होत नाही. यासाठी भाज्या जास्त दिवस ताज्या राखण्यासाठी थोडा सल्ला.

० पॉलिथिन पिशव्यांना समान अंतरराव छोटी-छोटी भोके पाडून त्यात भाज्या करून त्यांचे तोंड रबरबॅण्डने बंद करून करून ठेवा. भाज्या जास्त दिवस ताज्या राहतील.

० सलादाची पाने ताजी राखण्यासाठी ती बोरिक पावडरच्या पाण्यात भिजवा. वापरण्यापूर्वी दोन-तीन वेळा धुऊन घ्या. पाने ताजी राहतील.

० भाज्या शिळ्या झाल्यास थंड पाण्यात एक-दोन लिंबाचा रस पिळून त्या पाण्यात त्या भिजवा. नंतर धुऊन चिरून घ्या. भाज्यांची रंगत परतून येईल.

० पुदिना आणि कोथिंबीर ओल्या कापडात गुंडाळून थंड जागी ठेवा. त्या जास्त काळ ताज्या राहतील.

० लिंबू ताजी राखण्यासाठी थंड पाणी भरलेल्या चिनीमातीच्या बरणीत ठेवा. पाणी रोज बदलत राहा. लिंबू वाळणार नाहीत.

० भेंडीवर तेल चोपडून ठेवल्यास ती जास्त काळ ताजी राहील. वापरण्यापूर्वी धुऊन स्वच्छ फडक्याने पुसून घ्या. ० माती लागलेले बटाटे जास्त दिस टिकतात. यासाठी ते धुऊन ठेवू नका.

० लसूण वर्षभर राहण्यासाठी तो मातीच्या गाडग्यात ठेवा.

० हिरव्या मिरच्या देठ तोडून ठेवल्यास जास्त काळ ताज्या राहतात. हिरव्या मिरच्या थोडीशी हळद टाकून बरणीत ठेवून वरून मलमली कापडाने झाकावे. मिरच्या लवकर लाल होणार नाहीत.

# विवाहित पुरुषांना का आवडते परस्त्री..

## चाणक्य नीतीमध्ये सांगितलंय रहस्य



विवाहित पुरुष परस्त्रीकडे का आकर्षित होतात या गोष्टीची कारणमीमांसा चाणक्य नीती या ग्रंथात आहे. यानुसार, कमी वयात झालेलं लग्न, शरीरसुखाचा अभाव आणि मुलांचा जन्म या कारणांमुळे पुरुष परस्त्रीकडे आकर्षित होतात. काही पुरुष तर लग्नानंतर काही दिवसांतच इतर स्त्रियांच्या संपर्कात येतात. काही पुरुषांना परदेशी महिलांना भेटण्या बघण्याची इच्छा असते. असं असलं तरीही अशा पुरुषांच्या पत्नीच्या दृष्टीने ही गोष्ट मानहानीकारक आहे. आपल्या नवऱ्याला इतर स्त्रियांच्या संपर्कात आलेलं पाहणं ही गोष्ट कोणत्याही स्वाभिमानी स्त्रीला आवडणार नाही. पुरुष असं का वागतात याची कारणं चाणक्य नीतीमध्ये सांगितलेली आहेत. पाहू या.

**कारणं काय**

चाणक्य नीति जीवनाच्या अनेक पैलूंबद्दल तत्त्वे देते. धर्म, संपत्ती, कर्म, मोक्ष, कौटुंबिक जीवन, नातेसंबंध ते देश. चाणक्य यांच्या मते, पती आपल्या पत्नीपासून विभक्त होण्याची कारणे जाणून घेऊया.

**भावनिक समस्या**

स्त्री-पुरुषांना एकमेकांकडे आकर्षित होणे स्वाभाविक आहे. पण जेव्हा हे नाते बिघडवते तेव्हा विवाह धोक्यात येतो. जर आकर्षण नियंत्रित केले नाही तर ते विवाहबाह्य संबंधांना कारणीभूत ठरू शकते. ही प्रत्येकासाठी एक मानसिक आणि भावनिक समस्या आहे.

**लहान वयात लग्न**

लहान वयात लग्न करणे कधीकधी नात्यासाठी हानिकारक ठरू शकते. या वयात जागरूकता आणि करिअरवर लक्ष केंद्रित नसल्यामुळे, जोडीदारासाठी कमी वेळ आणि लक्ष मिळते. एकदा जीवनात एक विशिष्ट स्थिरता आली की, इच्छा बदलतात आणि इतरांबद्दल आकर्षण वाढू शकते.


**एकमेकांशी प्रामाणिक राहणे महत्त्वाचे**

पती-पत्नीमधील शारीरिक संबंध समाधानकारक नसतील तर नात्यातील आकर्षण कमी होईल. यामुळे वैवाहिक जीवनातही अशांतता निर्माण होते. अशा मुद्द्यांवर मनापासून बोलल्याने समाधानापेक्षा जास्त दिलासा मिळू शकतो. जरी काही लोक विवाहबाह्य संबंधांना ठीक मानतात, तरी त्यामुळे पती-पत्नीमधील विश्वासाचे बंधन तुटते. एकमेकांशी प्रामाणिक राहणे महत्त्वाचे आहे. अन्यथा, नाते बिघडेल.

**विश्वास, प्रेम आणि संयम**

काही कुटुंबांमध्ये असे दिसून येते की मुलांच्या जन्मानंतर, पत्नीचे सर्व लक्ष मुलावर केंद्रित झाल्यामुळे पती त्याच्या पत्नीपासून दूर जातो. तथापि, हे फक्त तात्पुरते असते. जर तुम्ही दोघे एकमेकांशी बोललात तर नाते पुन्हा सुरू होऊ शकते. वैवाहिक नाते टिकवून ठेवण्यासाठी परस्पर समजूतदारपणा, विश्वास, प्रेम आणि संयम आवश्यक आहेत. जेव्हा समस्या उद्भवतात तेव्हा त्यापासून पळून जाण्यापेक्षा संवादाद्वारे त्या सोडवणे चांगले. जर तुम्ही खरोखर एकमेकांना समजून घेतले तर हे बंधन आणखी मजबूत होईल.

## चांगली पर्सनॅलिटी आणि जॉबमध्ये उच्चपद प्राप्तीसाठी करा हा उपाय



हिंदू प्राचीन धर्म ग्रंथामध्ये सूर्याला देवता मानण्यात आले आहे. सूर्य हे साक्षात दिसणारे एकमेव देवता आहेत. वेदामध्ये सूर्यदेवाला तेज, ओज, आयुची वृद्धी करणारे मानले गेले आहे.

ज्योतिष शास्त्रात सूर्य आत्मा आणि पिता कारक देव आहे. सूर्य एक असा ग्रह आहे जो व्यक्तीला मान-सन्मान, चांगली पर्सनॅलिटी व जॉबमध्ये पद आणि अधिकार मिळवून देतो. ग्रहांचा राजा असल्यामुळे सूर्यदेवाचे पूजन समाजात उच्च स्थान प्राप्त करून देते.

यामुळे मान-सन्मानाच्या प्राप्तीसाठी, सरकारी कामातील अडचणी दूर करण्यासाठी आणि आत्मबळ वृद्धीसाठी उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याचे आणि अर्घ्य देण्याचे विधान आहे. सूर्यदेवाचा दिवस रविवार मानण्यात आला आहे, परंतु दररोज सूर्यदेवाला अर्घ्य देण्याचे महत्त्व शास्त्रात सांगण्यात आले आहे. जर पहिल्यांदाच सूर्यदेवाला अर्घ्य देत असाल तर रविवारपासून सुरुवात करावी.

**अशाप्रकारे द्यावे सूर्याला अर्घ्य**

अर्घ्य देण्यासाठी सकाळी झोपेतून उठल्यानंतर स्नान करून तांब्याच्या कलशात पाणी घेऊन त्यामध्ये लाल चंदन, अक्षता, लाल फुल टाकून दोन्ही हात सूर्यदेवाकडे करून सूर्य गायत्री मंत्र (ऊँ भास्कराय विद्महे आदित्याय धीमहि तन्नो सूर्यः प्रचोदयात्) किंवा ऊँ सूर्याय नमः अर्घ्यं समर्पयामि मंत्राचा उच्चार करून जल अर्पण करावे. जल अर्पण केल्यानंतर सूर्यदेवाला सात प्रदक्षिणा घालून नमस्कार करावा.

- सूर्योपनिषदनुसार सर्व देवी-देवता, ऋषी व पितर सूर्याच्या किरणांमध्ये निवास करतात.

शास्त्रामध्ये सांगण्यात आले आहे की...

मानसं वाचिकं वापि कायजं यच्च दुष्कृतम्।
सर्वसूर्य प्रसादेन तदशेषं व्योपहति।।

**अर्थ** - जो व्यक्ती ज्या कोणत्या इच्छेने सूर्यदेवाची उपासना व पूजा करतो, सूर्यदेव त्या व्यक्तीचे सर्व कार्य पूर्ण करतात. सूर्यदेवाच्या कृपेने मन, वाणी आणि शरीराने झालेले सर्व पाप नष्ट होतात.

- अग्निपुराणात सांगण्यात आले आहे की, गायत्री मंत्राने सूर्याला अर्घ्य दिल्यास व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

## दाम्पत्य जीवनाला संजीवनीसाठी लग्नाचा वाढदिवस उपयुक्त



लग्नाचा वाढदिवस मोठ्या धामधुमीतच साजरा करायला व पैसा पाण्यासारखा खर्च करायला हवा असे नाही. त्याऐवजी या दिवशी पती-पत्नीने दाम्पत्य जीवनाबाबत आत्ममंथन करुन आपापसातील मतभेद दूर सारुन एकमेकांच्या जवळ यावे.

लग्नाचा वाढदिवस जुन्या-सुखद स्मृती पुन्हा जागवणारा हा दिवस. दाम्पत्य जीवनातील विस्कळीतपणा संपवून पती-पत्नीचे भांडण मिटवून त्यांना हा दिवस जवळ आणतो. लग्नाचा वाढदिवस मोठ्या धामधुमीतच साजरा करायला व पैसा पाण्यासारखा खर्च करायला हवा असे काही नाही. त्याऐवजी या दिवशी पती-पत्नीने दाम्पत्य जीवनाबाबत आत्ममंथन करुन आपापसातील मतभेद दूर सारुन एकमेकांच्या जवळ यावे, जर आपण लग्नाचा वाढदिवस मोठ्या दिमाखातच साजरा करायचे ठरविले असेल तरी काही हरकत नाही,पण फालतू प्रदर्शन करणे योग्य नव्हे. घरातच छोटीश्या मेजवानीचे आयोजन करावे. या पार्टीत जवळच्या नातलग. मित्रांना बोलावून आनंद घेऊ शकता. पाहुण्यांसाठी हलक्या-फुलक्या अल्पोपहार व मनोरंजनाची व्यवस्था करावी. शक्य असल्यास यासाठी आधीच कार्यक्रम ठरवून ठेवावा.

पार्टीनंतर रात्री एकमेकांजवळ बसून आपले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करावा. संसाराची गाडी सुरळीत चालण्यासाठी परस्परांची मदत करण्याची शपथ घ्यावी. पती-पत्नीने परस्परांसोबतच्या आपल्या साऱ्या आंबट-गोड क्षणांचा ताळेबंद आपल्या मनात तयार करावा. शक्य असल्यास हे सारे क्षण डायरीत उतरवून ठेवावेत, या दिवशी आपल्या लग्नाचे वातावरण पुन्हा निर्माण करु शकता, पण जास्त प्रदर्शन न करता एकमेकांच्या सहवासात तसे करावे.

## केसांमध्ये तूप लावा, अन् लाभ मिळवा



आहारात तुपाचा समावेश केल्याने होणारे फायदे सर्वांना माहीतच असतील, परंतू आपल्याला हे माहीत आहे का केसांच्या आरोग्यासाठीही तूप एक उत्तम पर्याय आहे. विश्वास होत नसेल तर अमलात आणू पहा. नरम, चमकदार आणि सुंदर केसांसाठी तूप वापरा आणि बघा हे फायदे-

**कोंड्यापासून सुटका मिळविण्यासाठी** - आपल्या केसांमध्ये कोंडा असेल तर केसांच्या मुळात तूप आणि बदामाचे तेलाने मसाज केली पाहिजे. याने डोक्यावरील त्वचा कोरडी राहणार नाही त्यामुळे कोंडा होण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही.

**दुहेरी केस** - खालील बाजूचे केस दोन भागात विभाजित होणे, अर्थात दुहेरी केस झाल्यावर ते वाईट दिसतात आणि त्यांची वाढही थांबते. यापासून सुटका मिळवण्यासाठी तुपाची मसाज करायला पाहिजे. काही दिवस तुपाने मसाज केल्यावर ही समस्या दूर होईल.

**केसांचा विकास**- जर आपल्या केसांचा विकास होत नसेल आणि आपल्याला लांब सडक केसांची आवड असेल तर केसांमध्ये तुपाची मालीश करावी आणि आवळा-कांद्याचा रस लावावा. दर १५ दिवसात एकदा ही प्रक्रिया अवश्य अंमलात आणावी.

**कंडिशनर** - केसांमध्ये तूप सर्वोत्तम कंडिशनरचे काम करतं. हे आपल्या केसांना नरम बनवतं आणि केस गुंतवण्यापासून सुटका मिळेल. जैतूनच्या तेलासोबत हा उपाय केल्याने उत्तम परिणाम प्राप्त होतात.

**चमक** - केसांना नैसर्गिक चमक देण्यासाठी तूप लावणे उत्तम पर्याय आहे. वाईट ते वाईट परिस्थितीत असलेल्या केसांमध्येदेखील तूप लावल्याने चमक येते.

## पालेभाज्यांचे औषधी उपयोग



**कोथिंबीर** : उष्णता कमी करणारी, पित्तनाशक असते. हृदरोगावर अतिशय उपयुक्त आहे.

**कढीलिंब** : पित्तनाशक व कृमीनाशक म्हणून याचा उपयोग होतो.

**पालक** : मूत्रसंस्था, पचनसंस्था यांच्या आतील सूजेला मऊपणा आणण्यास उपयुक्त असून दमा व खोकला कमी करणारी आहे.

**माठ** : हृदयाच्या कार्याला उपयोगी असून ही भाजी खाल्यावर शौचाला साफ होते.

**चाकवत** : ही पचण्याला सुलभ असून ज्वरनाशक आहे. त्वचेला कांती देणारी अशी ही भाजी आहे. ही भाजी कृमीनाशक असून यकृताच्या सर्व विकारांवर उपयुक्त आहे.

**हादगा** : खोकला, पित्त, हिवताप कमी करणारी ही भाजी आहे. या भाजीच्या फुलाच्या रसाचे दोन थेंब काही दिवस डोळ्यात घातल्यास रातआंधळेपणा नाहीसा होतो असे म्हणतात. हा फुलांचा रस मधातून घेतल्याने छातीतील कफ लवकर सुटतो.

**अळू** : याच्या पानांचा व दांड्यांचा रस जंतुनाशक आहे. त्यामुळे शरिराच्या कापलेल्या भागावर याचा रस लावून पट्टी बांधल्यास जखमा लवकर भरून येतात. याचा रस साखरेबरोबर दिवसातून दोन-तीन वेळा घेतल्यास मूळव्याध कमी होते.

**अंबाडी** : मीरपूड व साखर यांच्याबरोबर अंबाडीचा रस प्राशन केल्यास तो पित्तनाशक ठरतो.

**घोळ** : मूळव्याध कमी करण्यास ही भाजी उपयुक्त आहे. शिवाय ती खाल्ल्यामुळे लघवीला साफ आणि भरपूर होते.

**टाकळा** : सर्वांगाला येणारी खाज ही भाजी खाल्याने कमी होते. या भाजीच्या बियांच्या पीठ अशक्तपाणा कमी करण्यास उपयुक्त आहे.

**मायाळू** : अंगावर पित्त उठले असताना याच्या पानांचा रस आंगाला चोळल्यास पित्त कमी हत्ते. लहानमुलांना थंडी खोकला झाला असताना मायाळूच्या पानाचा रस चमचाभर देतात.

**तांदुळजा** : बाळंतीणीला दूध वाढवण्यास ही भाजी उपयोगी ठरते.

**मेथी** : सारक व पथ्यकर असलेल्या या भाजीमध्ये लोहाचे प्रमाण बरेच आहे. याचे बी वातहारक व शक्तिकारक असते म्हणून बाळंतपणात याचा उपयोग केला जातो. दूधवाढीसाठीही त्याचा उपयोग होतो. मेथ्यांचे पीठ तोंडाला लावल्यास चेहऱ्यावरील सुरकुत्या नष्ट होतात व चेहरा तजेलदार दिसतो.

**शेपू** : वातनाशक व पोटदुखी कमी करणारी अशी ही भाजी आहे.

**शेवगा** : ही भाजी वातनाशक व पित्तनाशक आहे. हृदय व रुधिराभिसरण क्रिया यामुळे सुधारतात.

**सॅलड** : या भाजीमध्ये लेसीथीन नावाचे द्रव्य असते. मजासंस्थेचे कार्य सुधारण्यास त्यामुळे मदत होते. मेंदूवर जास्त ताण पडणाऱ्यांनी नियमित सॅलड खावे.

## एखाद्या मुलीचा पती कसा असतो 'हे' राशीनुसार समजते



एखाद्या मुलीचा पती कसा असू शकतो, याविषयी ज्योतिषमध्ये सांगण्यात आलेल्या राशीनुसार समजू शकते. एकूण १२ राशी सांगण्यात आल्या असून जन्माच्या वेळी चंद्र ज्या राशीमध्ये असतो ती त्या व्यक्तीची राशी असते. उज्जैनचे ज्योतिषाचार्य पं. मनीष शर्मा यांच्यानुसार नाव राशीनुसार जाणून घ्या, जोडीसाराच्या खास गोष्टी...

**मेष** : एखाद्या मुलीशी मेष राशी असल्यास तिचा जोडीदार धनवान असू शकतो. तो अनेक घर,जमिनींचा मालक असू शकतो तसचे यांचे वैवाहिक जीवन सुखी आणि समृद्धशाली राहते.

**वृषभ** : या राशीच्या मुलींना सुंदर आणि गुणवान पतीची प्राप्ती होते. यांचा जोडीदार गोड बोलणारा आणि पत्नीची प्रत्येक गोष्ट ऐकणारा असतो.

**मिथुन** : या राशीच्या मुलींचा पती दिसायला सामान्य, समजूतदार आणि उच्च विचारांचा असतो. यांचा जोडीदार कुशल व्यापारी असतो.

**कर्क** : या राशीच्या मुलींचा जोडीदार सुंदर रंगरूप असणारा असतो. यांचे वैवाहिक जीवन सुखी आणि समृद्धशाली राहते.

**सिंह** : या राशीच्या मुलींचा पती स्वतःचे म्हणणे खरे करणारा असतो. यांच्या मनासारखे घडले नाही तर यांना खूप राग येतो. अशा स्त्रियांचे पती प्रामाणिक असतात.

**कन्या** : या राशीच्या मुलींचा पती सुंदर आणि गुणवान असतो. तो खूप कष्ट करून काम पूर्ण करून यश संपादन करणारा असतो. अशा स्त्रियांचे आयुष्य लग्नानंतर आणखीनच चांगले होते.

**तूळ** : या राशीच्या स्त्रीचा पती शिक्षित आणि सुंदर असतो. यांचा जोडीदार जीवनातील प्रत्येक अडचणीत पत्नीची मदत करणारा असतो.

**वृश्चिक** : या राशीच्या मुलींना सुशिक्षित पतीची प्राप्ती होते. यांचा जोडीदार कठीण परिश्रम करणारा असतो.

**धनु** : या राशीच्या मुलींचा पती स्वाभिमानी असतो. यांचा जोडीदार सामान्य कुटुंबातील असतो आणि सामान्य जीवन व्यतीत करतो.

**मकर** : या राशीच्या मुलींचा पती धार्मिक कर्मामध्ये जास्त रुची ठेवणारा असतो. यांना दिव्य शक्तींवर जास्त विश्वास असतो.

**कुंभ** : या राशीच्या मुलींचा पती देवावर विश्वास ठेवणारा आणि सभ्य स्वभावाचा असतो.

**मीन** : या राशीच्या स्त्रीचा पती गुणवान आणि धार्मिक स्वभावाचा असतो हे लोक आकर्षक व्यक्तिमत्वाचे धनी असतात. याच कारणामुळे कुटुंब आणि समाजात हे आकर्षणाचे केंद्र राहतात.

## छान छान गोष्टी...

## धनलाभाचा योग

एक होता ब्राह्मण त्याचे नाव विश्वंभर. तो उत्तम ज्योतिषी होता. दूरवरचे लोक त्याच्याकडे सल्ला मागण्यासाठी येत. त्याने सांगितलेले उपाय करुन अनेकांचे नशीब पालटले होते. मात्र विश्वंभर स्वत: गरीब होता. त्याची पत्नी या गोष्टीवरुन त्याला नेहमी टोचत असे. पण तो म्हणे आपल्या नशिबातच धनलाभ नाही. त्याला काय करणार ? पण तिला काही ते पटत नसे. ती पतीला सतत छळत राही. एके दिवशी वैतागलेल्या विश्वंभरने कुंडली मांडली, भविष्य पाहिले. त्याला धनलाभाचा एक मार्ग सापडला.

तो पत्नीला म्हणाला, येत्या पौर्णिमेच्या मध्यरात्री धनलाभाचा एक योग आहे. मी महालक्ष्मी यंत्राचा जप करीन. तु चुलीवर पाणी उकळत ठेव. मी जप सुरु केल्यापासून पाणी उकळत ठेव. सहस्त्रावर्तने झाली की, 'हूँ' म्हणेन. मग तू उकळत्या पाण्यात सुपभर ज्वारी टाक. योग्य मुहूर्तावर जर ज्वारी उकळत्या पाण्यात पडली, तर त्या ज्वारीचे मोती बनतील. आपण ते विकून श्रीमंत होऊ.

विश्वंभर हे सांगत असताना, शेजारच्या खोलीत व्यापाऱ्याची बायको हे ऐकत होती. तिनेही तो प्रयोग करायचे ठरवले. तयारी करुन ठेवली. पाणी, लाकडे, ज्वारी, चूल...

पौर्णिमेच्या मध्यरात्री त्याने जप आरंभ केला. इकडे विश्वंभरच्या पत्नीने, तर पलीकडे व्यापाऱ्याच्या बायकोने पाणी उकळत ठेवले. जप पूर्ण होण्यास ३/४ तास लागले. दोघीही चुलीत लाकडे सारत पाणी उकळत होत्या. मध्येच विश्वंभरच्या बायकोला डुलकी लागली. तिची चूल विझून गेली. मात्र मात्र व्यापाऱ्याच्या बायकोने चूल पेटत ठेवली होती. जप पूर्ण होताच विश्वंभरने उकळत्या पाण्यात ज्वारी टाकण्यास सांगितले. व्यापाऱ्याच्या बायकोने तसे केले. पण विश्वंभरची चूल विझलेली होती. ती पुन्हा पेटवून पाणी उकळेपर्यंत मुहूर्त सरला. त्यातील ज्वारीचे मोती झाले नाहीत. मात्र व्यापाऱ्याच्या बायकोच्या चुलीवरील पाण्यात वेळेवर ज्वारी टाकल्याने मोती बनले होते. विश्वंभरची बायको दु:खी झाली. विश्वंभर म्हणाला नशिबापुढे काही चालत नाही.

♦♦♦

## बालकन्यांची जपणूक कशी कराल ?

दिवसेंदिवस बालकन्यांवर बलात्कार केल्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अगदी ७-८ वर्षांच्या मुलीही नराधमांच्या वासनेच्या बळी ठरत आहे. वर हे नराधम या लहान कळ्यांचे गळे आवळून खून करताना दिसतात. कसं जपावं या दीपज्योतींना ? वासनेचं वादळ भोवती घोंघावत असतं. दोन हातांचा आडोसाही अपुरा ठरावा अशी समाजाची अवस्था झाली आहे. कोणतीही मुलगी सुरक्षित नाही अशी भयावह पसरली आहे. कुणाही व्यक्तीवर भरोसा राहिलेला नाही. या लहान कळ्यांच्या जपणुकीसाठी सावधानता म्हणून काही उपाय देत आहोत...

♦तुम्ही तुमच्या मुलीला शाळेत सोडायला व आणायला जात असाल तर चिंता नाही; परंतु तुमच्याऐवजी दुसऱ्या कोणाला पाठवणार असाल तर ती व्यक्ती विश्वासाची आहे का ? याचा विचार करा.

♦मुलीबरोबर नोकर, आया, ड्रायव्हर पाठवत असाल तर त्यांच्यावर संशय स्पष्टपणे घेऊ नका; परंतु नजर मात्र ठेवा. तुम्ही उगाच संशय घेतलात तर तो अपमानीत होईल.

♦मुलीला तिच्या शरीराची माहिती वेळोवेळी पण वयाप्रमाणे करुन देत राहा.

♦मुलीला अती जपू नका व ढीलही देऊ नका. जर सारखं जपणुकीचे धडे द्याल तर ती बंड करेल अथवा नाराज होईल.

♦ड्रायव्हर वा रिक्षा चालक यांचा परिचय, फोन नंबर जवळ ठेवा. तो व्यसनी नसावा याची काळजी घ्या.

♦वर्गशिक्षिकेच्या संपर्कात राहा. न्यायला आणायला उशीर होणार असेल तर फोनवरुन सांगा.♦मुलीला सांगून ठेवा की, अनोळखी स्त्री-पुरुषाच्या बोलण्यावरुन त्याच्याकडे जाऊ नको. खाऊ, चॉकलेट वा खेळणी घेऊ नकोस.

♦ अनोळखी व्यक्ती गरीब, भोळी वाटली तरी त्याच्याजवळ जाऊ नकोस असे मुलीला बजावणे.

♦निर्मनुष्य रस्त्याने जाऊ देऊ नये.

♦ मुलीजवळ सुटी नाणी देऊन ठेवा. म्हणजे ती पब्लिक फोन बूथवरुन संपर्क साधू शकेल.♦ मुलीजवळ जवळच्या पोलीस स्टेशनचा नंबर देऊन ठेवा. आईने मुलीशी मैत्रिणीचे नाते ठेवावे म्हणजे ती घडलेल्या घटना आईला सांगू शकेल. ♦मुलगी एकाएकी गपचूप राहू लागली तर गोड बोलून, विश्वासात घेऊन विचारा. अनोळखी व्यक्ती घेऊन जाऊ लागली तर तिला चावायला सांगा. डोळ्यात बोट घालायला सांगा किंवा नाकावर ठोसा मारुन ओरडायला सांगा म्हणजे तिच्या मदतीला इतर लोक येतील.

## कुंडलीत गुरु कमजोर असल्यास गुरुवारी करा हे उपाय

जर आपल्या कुंडलीत गुरु अर्थात बृहस्पती कमजोर स्थितीत असेल तर आपल्याला याला शुभ करण्यासाठी प्रयत्न करायला हवे. जाणून घ्या बृहस्पतीला प्रसन्न कसे करावे -

१ गुरुवारी उपास करावा आणि पिवळ्या रंगाचे वस्त्र धारण केल्याने बृहस्पती प्रसन्न होतात. गुरुवारी व्रतकथा करणे आणि पिवळं अन्न किंवा पक्वान्न सेवन करणे शुभ फल देतं. २ या दिवशी केळीच्या झाडाला पिवळ्या रंगाच्या वस्तू अर्पित कराव्यात.३ गुरुवारी बृहस्पती संबंधी वस्तू दान केल्याने वेदना आणि दोषांपासून मुक्ती मिळते.४ पिवळे फुलं, पिवळे वस्त्र, साखर, घोडा (लाकडी किंवा खेळणी घोडा), चण्याची डाळ, हळद, ताजी फळं, मीठ, स्वर्णपत्र, पितळ इत्यादीचे दान करा.


**जाहीर नोटीस**

उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय
७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६३३०८३२ Email - sdopune@gmail.com

क्र. मृत्यु/रजि./एसआर/६५/२०२४

१) श्री. मनोज विठ्ठल करंजावणे,
रा. खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे .... अर्जदार

विरुध्द

२) जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी/ निबंधक
ग्रामपंचायत खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे ....जाबदेणार

विषय :- जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्री. मनोज विठ्ठल करंजावणे, रा. खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे** (अपिलार्थी) **यांनी** त्यांचे **आई कै. गीता विठ्ठल करंजावणे,** यांचा, मृत्यु दि. **१६/०३/२००७ रोजी मौजे खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे येथे** झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) प्रमाणे मृत्युची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. ११/०८/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण : पुणे (शिक्का) सही/-
(डॉ. यशवंत माने)
दिनांक : ११/०८/२०२५ उपविभागीय दंडाधिकारी, हवेली उपविभाग पुणे



दैनिक जनप्रवास 17-08-2025

**CHANGE IN NAME**

I declare by this publication about change in my name
OLD NAME: AERAF FIROJ QURESHI
CHANGE IN TO MY NAME: YERAF FIROJ KURESHI
Present address: Kureshi Nagar, Kharda Road, Jamkhed, Tal Jamkhed, Dist Ahmednagar, Maharashtra -413201.

Mo. 9697604007



**राहुरी नगरपरिषद, राहुरी**
ता. राहुरी, जिल्हा अहिल्यानगर, पिन कोड -४१३७०५
दुरध्वनी कार्यालय (०२४२६) २३२६४२,
टोल फ्रि नं. १८००२३३४०३४१ Mail ID-corahurigmail.com

जा.क्र. कावि/१४/२०२५ दिनांक १४/०८/२०२५

**भांडार विभाग**
**जाहीर निविदा सुचना २५-२६**

राहुरी नगरपरिषदेस सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागांसाठी दैनंदिन लागणारे जंतुनाशके खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार/अधिकृत पुरवठादार/अनुभवी मक्तेदार यांच्याकडून खालीलप्रमाणे जाहिर निविदा व्दि लिफाफा पध्दतीने भागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | निविदा इसारा | कोरे निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | शहर स्वच्छता विभागासाठी जंतूनाशके पुरविणे. | २०००/- | ३००/- |
| २ | गणेश विसर्जनासाठी आवश्यक केमीकल पुरविणे | १०००/- | २००/- |
| ३ | गणेश विसर्जनासाठी आवश्यक प्लास्टीक शिट पुरविणे | ५००/- | १००/- |

**नियम व अटी**
१.कोरे निविदा फॉर्म दिनांक १८/०८/२०२५ ते दि २५/०८/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील.
२. मोहोरबंद निविदा दि. २६/०८/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत नागरी सुविधा केंद्रात स्विकारल्या जातील.
३. निविदा व्दि लिफाफा पध्दतीने दयाव्यात पहिल्या लिफाफ्यात तांत्रिक बोली यात आयकर, सेवाकर, विवरणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, भागीदारी फर्म असल्यास त्याचे कागदपत्र व दुस या लिफाफ्यात वित्तीय बोली दयाव्या निविदा उघडताना प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडण्यात येईल पहिल्या लिफाफ्यात अटी व शर्तीची पुर्तता होत नसेल तर वित्तीय लिफाफा उघडण्यात येणार नाही.
४. निविदा इसारा रक्कम नागरी सुविधा केंद्रात रोख भरावी लागेल.
५. निविदा मंजुरीनंतर योग्य त्या किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून दयावा लागेल.
६. निवीदा दर सर्व शासकीय करासह द्यावेत. कोणताही कर अतिरिक्त दिला जाणार नाही. सर्व शासकीय करांची व शुल्कांची कपात बिलातुन करण्यात येईल.
७. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २८/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्याधिकारी यांचे कक्षात निविदाधारक किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष निवीदा समितीमार्फत अथवा मे.सभेत उघडण्यात येतील.
८. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे हक्क नगरपरिषदेने राखुन ठेवले आहेत.
९. जंतुनाशके पुरवठा केल्यानंतर एक महिन्याच्या आत बिल सादर करावे लागेल त्यानंतर प्राप्त झालेल्या बिला बाबत लेखा परिक्षणात काही आक्षेप निघाल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहाणार नाही.

(शिक्का) सही/-
(श्री.वैभव लोंढे)
मुख्याधिकारी तथा प्रशासक

# कलाविश्व

## आशीष वर्मा म्हणाले: कायद्याच्या समजुतीमुळे परम'ला खरी आणि जमिनीशी जोडलेली ओळख मिळाली



आशीष वर्मा आपल्या नवीन मालिकेसह कोर्ट कचहरी'तून स्क्रीनवर परतले आहेत. ही एक लीगल ड्रामा आहे जी कुटुंबाची परंपरा, ओळख आणि स्वतःची गोष्ट सांगण्यासारख्या विषयांना खोलवर स्पर्श करते. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या मालिकेत आशीष यांना त्यांच्या विश्वासार्ह आणि जमिनीशी जोडलेल्या अभिनयासाठी प्रशंसा मिळत आहे. आपल्या परम' या भूमिकेबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की त्यांचा कायद्याचा पार्श्वभूमी या भूमिकेला अधिक विश्वासार्ह बनवण्यासाठी कशी उपयोगी पडली.

ते म्हणाले, माझी आई आणि आजोबा वकील होते, आणि मी स्वतःही लॉ स्कूलच्या प्रवेश परीक्षेला बसलो होतो, त्यामुळे कायद्याचं वातावरण माझ्या दैनंदिन आयुष्याचा भाग होतं. ही ओळख माझ्यासाठी परम'ला जमिनीशी जोडलेलं आणि खरं ठेवण्यात मदतगार ठरली, त्याला नाटकी न बनवण्यात.

जरी त्यांचं कुटुंब कायदा आणि वैद्यकीय क्षेत्राशी घट्टपणे जोडलेलं होतं, तरी त्यांनी आशीष यांच्या रंगभूमीवरील प्रेमाला नेहमीच प्रोत्साहन दिलं. माझे आई-वडील जरी कायदा आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित होते, तरी त्यांनी सुरुवातीपासूनच माझ्या थिएटरवरील प्रेमाला पाठिंबा दिला. त्यांनी मला माझं स्वप्न पूर्ण करू दिलं, आणि हाच सर्वात मोठा फरक होता, असं आशीष यांनी पुढे सांगितलं.

जमिनीवरच्या गोष्टी निवडण्यासाठी ओळखले जाणारे आशीष वर्मा यांनी कोर्ट कचहरी'मध्ये आणखी एक रंजक पात्र निवडलं आहे, ज्यात ते अतिशय सहजपणे मिसळताना दिसतात. त्यांची प्रामाणिक अभिनयशैली आणि नैसर्गिक संवादफेक फक्त प्रेक्षकांचं मन जिंकत नाही, तर समीक्षकांनाही त्यांच्या अभिनयाची रेंज दाखवते.

ही लीगल ड्रामा एक दमदार कलाकारांसह सादर होते, ज्यात पवन मल्होत्रा आणि आशीष वर्मा मुख्य भूमिकेत आहेत, तसेच पुनीत बत्रा, प्रियाशा भारद्वाज, भूषण विकास, किरण खोजे, सुमाली खनिवाले आणि आनंदेश्वर द्विवेदी महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. कोर्ट कचहरी' आता डेपू डखत वर स्ट्रीम होत आहे, आणि ती आठवड्याच्या शेवटसाठी पाहण्यासारखी संपूर्ण मालिका आहे.

अविनाश तिवारी सध्या करिअरच्या उंचीवर आहेत! नुकतंच त्यांनी गिन्नी वेड्स सनी २* चे शूटिंग पूर्ण केले असून, आता बातम्या आहेत की ते आपल्या पुढच्या मोठ्या चित्रपटासाठी सज्ज आहेत. चर्चा अशी आहे की *मडगाव एक्सप्रेस* फेम अविनाश तिवारी दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांच्या पुढच्या चित्रपटाचा भाग

## अविनाश तिवारी विशाल भारद्वाजच्या पुढच्या चित्रपटात साकारणार दमदार भूमिका



होऊ शकतात, ज्यात ते पहिल्यांदाच शाहिद कपूरसोबत आणि पुन्हा एकदा तृप्ती डिमरीसोबत स्क्रीन शेअर करणार आहेत.

एका सूत्राच्या माहितीनुसार, फिल्म इंडस्ट्रीत चर्चा आहे की विशाल भारद्वाज यांचा पुढचा मोठा चित्रपट स्पेनमध्ये शूट होत आहे, ज्यात शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी झळकणार असून आता अविनाश तिवारीचं नावही यात जोडले जात आहे. सांगितलं जातंय की या चित्रपटात अविनाश एक दमदार आणि नव्या अंदाजात दिसणार आहेत. जर ही बातमी खरी ठरली, तर हा तृप्ती आणि अविनाशचा *लैला-मजनूं* नंतरचा दुसरा चित्रपट असेल आणि शाहिद व विशाल भारद्वाजसोबतचा पहिलाच कोलॅबोरेशन असेल. यामुळेच चाहत्यांमध्ये आणि फिल्म इंडस्ट्रीत प्रचंड उत्साह आहे.

अविनाश तिवारी नेहमीच वेगळ्या भूमिका करण्यासाठी ओळखले जातात आणि आपल्या अभिनयातून काहीतरी नवं देण्याचा प्रयत्न करतात. जर हा कोलॅबोरेशन खरा ठरला, तर प्रेक्षकांना एका मोठ्या चित्रपटात तीन दमदार कलाकारांना – अविनाश तिवारी, शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी – आणि तेही विशाल भारद्वाज यांच्या दिग्दर्शनाखाली, एकत्र पाहण्याची संधी मिळेल!

## सलमान-ऐश्वर्याचा हा चित्रपट पाहिला अन् जया बच्चन काही न बोलता थेट निघून गेल्या

जया बच्चन नेहमीच या ना त्या कारणाने चर्चेत असतात. जया बच्चन त्यांच्या फटकळ स्वभावामुळे जास्त चर्चेत असतात. हे फक्त त्यांच्या चाहत्यांच्याबाबतच होत नाही तर बऱ्याच सेलिब्रिटींनाही त्यांचा हा अनुभव आला आहे. त्यातील एक प्रसिद्ध व्यक्ती म्हणजे दिग्दर्शक संजय लीला भन्साळी. संजय लीला भन्साळी हे त्यांच्या भव्य सेट्स, उत्तम संगीत आणि उत्तम प्रेमकथा असलेल्या चित्रपटांसाठी ओळखले जातात.

दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांचे अनेक चित्रपट आजही लोकांच्या मनात आहेत. त्यांच्या चित्रपटाची आणखी एक जमेची बाजू म्हणजे चित्रपटातील गाणी.असाच एक चित्रपट म्हणजे हम दिल दे चुके सनम'. हा चित्रपट १९९९ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. हा चित्रपट प्रचंड हिट झाला होता. आजही हा चित्रपट लोक आवडीने पाहतात आणि त्यातील गाणी देखील आजही लोकांच्या ओठांवर दिसतात. पण हा चित्रपट पाहिल्यानंतर जया बच्चनची प्रतिक्रिया पाहून दिग्दर्शक स्वतःही थक्क झाले होते. हम दिल दे चुके सनम' च्या स्पेशल स्क्रिनिंगनंतर अनेक प्रेक्षक येऊन त्यांचे कौतुक करत होते, तसेच अनेक सेलिब्रिटींनी देखील संजय यांचे कौतुक केले पण जया बच्चन यांनी तसे केले नाही, जया भन्साळींकडे पाहून हसल्या आणि नंतर काहीही न बोलता शांतपणे निघून गेल्या. त्यानंतर जया बच्चन यांच्या शांततेने त्यांना असा विचार करायला भाग पाडले की कदाचित त्यांना हा चित्रपट आवडला नसेल.

# 'विरोधकांची विकास विरोधी हंडी जनतेने फोडली'; उपमुख्यमंत्री शिंदेंचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

**जनप्रवास । प्रतिनिधी**

ठाणे : तीन वर्षापूर्वी आम्ही विकासाचे थर लावले आणि विकासाची हंडी फोडली. मात्र विरोधकांनी विकास विरोधी थर लावले मात्र त्यांची ही हंडी महाराष्ट्रामधील जनेतने फोडून टाकली, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

ठाण्यातील टेम्भी नाक्यावरील दिघे यांच्या मनाच्या हंडीला त्यांनी हजेरी लावली यावेळी त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. यापुढेही आपल्याला विकासाचे थर लावायचे असून ठाण्यासह राज्याचा विकास करायचा असल्याचे ते म्हणाले.



विधानसभेची हंडी महायुती फोडणार असे मी म्हणालो होतो आणि आम्ही २३२ थर लावून आमदार निवडून आणले आणि विजयाची हंडी फोडली. पहलगाम हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानची हंडी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणि भारतीय लष्कराने फोडली. पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिली. आता पाकिस्तानने पुन्हा थर लावण्याचा प्रयत्न केला तर त्यांची कायमची हंडी फोडून टाकायची असल्याचेही ते म्हणाले.

**ठाणे ही गोविंदाची पंढरी**

दरवर्षी हजारो गोविंदा हे दिघे यांच्या या हंडीच्या ठिकाणी येतात आणि सलामी देऊन पुढे जातात. आनंद दिघे यांनी हा उत्सव सुरू केला आणि सातासमुद्रापार नेला. त्यामुळे ठाणे ही गोविंदाची पंढरी असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

या ठिकाणी कोणत्याही प्रकारची जीवघेणी स्पर्धा नसते. येथे सर्व गोविंदाची काळजी घेतली जाते. दिघे यांची मनाची आणि सोन्याची हंडी आहे, आणि आमचे सोने हेच आमचे गोविंदा आहेत. तुमच्या सर्वांच्या आशीर्वाद मुळे मी मुख्यमंत्री झालो आणि सण उत्सवावरील असलेली बंधने आम्ही काढून टाकली असल्याचेही ते म्हणाले.

## स्वातंत्र्यदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते विधानभवन येथे ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राज्यपाल राधाकृष्णन यांनी स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार बापूसाहेब पठारे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, उपस्थित होते.

## एमएमआरमध्ये दुबईपेक्षाही मोठे, सुंदर शहर वसवू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : पालघरमध्ये वाढवण बंदरालगत चौथी मुंबई तर अटल सेतूच्या पायथ्याशी तिसरी मुंबई वसविण्यात येणार आहे. ही नवीन शहरे वसविण्यासाठी विकासकांनी राज्य सरकारला सहाकार्य करावे. त्यांना आवश्यक ती मदत सरकार करेल. दोघांच्या सहकार्याने एमएमआरमध्ये येत्या १० वर्षांत दुबईपेक्षाही सुंदर असे मोठे शहर वसवून दाखवू, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी व्यक्त केला. वांद्रे-कुर्ला संकुल येथील क्रेडाय-एमसीएचआय आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.



देशातील पहिले सर्वात मोठे आणि जगातील पहिल्या १० क्रमांकात मोडणारे बंदर वाढवण येथे उभारले जाणार आहे. या बंदरामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. तर या बंदरामुळे विकासाच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे. या बंदराशी एमएमआरला जोडण्यासाठी उत्तन – विरार सागरी सेतूचा विस्तार विरार ते पालघर, वाढवण बंदर असा केला जाणार आहे. त्यामुळे वाढवण बंदरावर पोहचणे सोपे होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. या बंदरामुळे निर्माण होणाऱ्या संधी लक्षात घेता वाढवण बंदरालगत चौथी मुंबई वसविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) माध्यमातून चौथी मुंबई वसवली जाणार आहे. तर दुसरीकडे अटल सेतूमुळे मुंबईतून नवी मुंबईत, तसेच नवी मुंबई विमानतळावर अवघ्या काही मिनिटांत पोहचणे शक्य होऊ लागले आहे. त्यामुळे अटल सेतू प्रभावित क्षेत्रात निर्माण होणारी संधी लक्षात घेता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून तिसरी मुंबई वसविण्यात येत आहे. या चौथ्या आणि तिसऱ्या मुंबईच्या माध्यमातून एक चांगले शहर वसविण्यासाठी क्रेडाय-एमसीएचआयमधील विकासकांनी सरकारला सहकार्य करावे. तिसऱ्या मुंबईसाठी तुम्ही पुढे आलात, तर एमएमआरडीए आणि विकासक यांच्या संयुक्त भागिदारीतून तिसरी मुंबई वसविणे सोपे होईल.

## दहीहंडी उत्सवाला गालबोट दहीहंडी बांधताना तरुणाचा मृत्य; विविध ठिकाणी ३० जण जखमी

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : ठाण्यामध्ये उंच दहीहंडी फोडण्यासाठी थर रचण्यात गोविंदा पथके व्यग्र असतानाच उत्सवाला गालबोट लागले. मानखुर्द परिसरात बाल गोविंदांसाठी दहीहंडी बांधणाऱ्या एका गोविंदाचा पडून मृत्यू झाला. तर ठिकठिकाणी दहीहंडी फोडण्यासाठी रचलेल्या थरांवरून कोसळून ३० जण जखमी झाले.

मानखुर्दमधील महाराष्ट्र नगर परिसरात बाल गोविंदांसाठी दुपारी ३ च्या सुमारास दहीहंडी बांधत असताना जगमोहन शिवकिरण चौधरी (३२) याचा पहिल्या मजल्यावरून खाली पडून मृत्यू झाला. पहिल्या मजल्यावरून पडल्यानंतर जगमोहनला त्याच्या नेतावाईकांनी तातडीने गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, मुंबईमध्ये विविध ठिकाणी दहीहंडी फोडताना थरावरून पडल्याने ३० जण जखमी झाले आहेत. यातील १५ जणांना उपचार करून घरी पाठवण्यात आले, तर विविध रुग्णालयांमध्ये १५ गोविंदांवर उपचार सुरू आहेत.

मुंबई शहरामध्ये १८ जण जखमी झाले असून, त्यापैकी १२ जणांवर उपचार सुरू आहेत. ६ जणांना उपचार करून घरी पाठवण्यात आलेत. तसेच पूर्व उपनगरामध्ये सहा जण जखमी झाले आहेत त्यातील



तिघांवर रुग्णालयामध्ये उपचार सुरू असून, तिघांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पश्चिम उपनगरामध्ये सहा जण जखमी झाले आहेत. एकावर रुग्णालयामध्ये उपचार सुरू असून, पाच जणांना उपचार करून घरी सोडण्यात आले. दरम्यान, थरावरून कोसळून जखमी झालेल्या गोविंदाची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

जखमी गोविंदांपैकी पाच जणांवर केईएम रुग्णालयामध्ये उपचार करण्यात आले. नायर व शीव रुग्णालयामध्ये प्रत्येकी एका गोविंदावर उपचार करण्यात आले. जोगेश्वरीतील ट्रॉमा रुग्णालयामध्ये तीन आणि अन्य उपनगरीय रुग्णालयांमध्ये दोन जणांवर उपचार करण्यात आले. त्याचप्रमाणे जी.टी. रुग्णालय व सेंट जॉर्जेस रुग्णालयामध्ये प्रत्येकी एका गोविंदावर उपचार करण्यात आलेत. या दोन्ही व्यक्तींच्या डोक्याला मार लागला आहे.

## कॉटन असोसिएशन इंडियाच्यावतीने शेतकऱ्यांना बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपाचे वाटप

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : कॉटन असोसिएशन इंडिया तर्फे ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्ताने कॉटन एक्सचेंज बिल्डिंग, हॉटेल ग्रीन स्टेशन, मुंबई येथे भारतीय कपास निगमचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ललित कुमार गुप्ता, कॉटन असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष अतुल गणात्रा यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्यातील विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश विभागांमधील शेतकऱ्यांना बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी कॉटन असोसिएशन इंडियाचे सर्व संचालक विनय कोठारी, सुधीर मंत्री, श्याम मखारीया, पंकज नेपाणी, पंकज बंगडीवाला, मनीष डागा, मनीष शहा, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी ज्ञानेश्वर भामरे, धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील शेतकरी दिलीप हरी पवार, आनंदा चिन्ह, आबा मगन शिंपी, ईश्वर आत्माराम माळी, धनराज त्र्यंबक माळी, ज्ञानेश्वर संतोष पवार आदि मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी कॉटन असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष अतुल गणात्रा यांनी सांगितले की, आम्ही शेतकऱ्यांसाठी योग्य ते निर्णय घेत असून शेतकऱ्यांना जे सहकार्य करता येईल ते करत असतो.


यावेळी भारतीय कपास निगमचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ललित कुमार गुप्ता यांनी मनोगत व्यक्त केले.

## राष्ट्रध्वज स्तंभ तरुण पिढीला देशभक्तीची प्रेरणा देईल : उपमुख्यमंत्री अजित पवार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : नटराज नाट्य कला मंडळाच्यावतीने उभारण्यात राष्ट्रध्वज स्तंभ तरुण पिढीला देशभक्तीची प्रेरणा आणि या स्तंभावर फडकणारा तिरंगा नागरिकांना राष्ट्र प्रेमाची आठवण करुन देईल, स्वातंत्र्य दिनी मिळालेल्या या अमूल्य देणगीची जतन करण्याकरिता सर्वांनी मिळून प्रयत्न करुया, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

नटराज नाट्य कला मंदिराच्या परिसरात सामाजिक उत्तरदायित्व निधीतून उभारण्यात



आलेल्या ३० मीटर उंच राष्ट्रध्वज स्तंभाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार सुनेत्रा पवार, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, मुख्याधिकारी पंकज भुसे, नटराज नाट्य कला मंडळाचे अध्यक्ष किरण गुजर, रवींद्र लाड, विविध क्षेत्रातील मान्यवर आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, कवीवर्य मोरोपंत यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या बारामती शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात विविध देशभक्त आणि क्रांतिकारकांमध्ये बारामतीकरांचा सहभाग होता. सन १९४२ चा लढा तसेच १९४९ च्या स्वातंत्र्य लढ्यात विविध स्वातंत्र्य सैनिक सहभागी झाले होते. नगर परिषदेच्यवतीने सन १९७३ यावर्षी संविधान स्तंभ उभा केला, यामध्ये तालुक्यातील स्वातंत्र्यसंग्रामातील सैनिकांच्या नावांचा शिलालेख समाविष्ट आहे.

राष्ट्रध्वज देशाच्या स्वाभिमान, एकता आणि बलिदानाचे प्रतिक आहे, त्यामधील केशरी रंग हा धैर्य आणि त्याग, पांढरा रंग शांती आणि सत्य आणि हिरवा रंग समृद्धी आणि विश्वास तसेच मध्यभागी असलेले अशोक चक्र कायदा आणि प्रगतीचे प्रतिक आहे. महात्मा गांधी, शहिद भगत सिंग, राणी लक्ष्मीबाई, नेताजी सुभाषचंद्र बोस यासारख्या वीरांनी आपल्या प्राणाची आहुती देवून राष्ट्रध्वज उंचावला आहे.

## 'गणेशोत्सव राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यासाठी शासनाची जोरदार तयारी : मंत्री आशिष शेलार यांची घोषणा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : वर्षानुवर्षांची परंपरा असलेला गणेशोत्सव यावर्षी राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यास शासनाची यंत्रणा सज्ज झाली असून गणेशोत्सव मंडळे व घरगुती गणेश आरास स्पर्धा, चौकाचौकात रोशनाई, ड्रोन शो, विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा प्रकारे जल्लोषात गणेशोत्सव साजरा होणार आहे. यावेळी प्रथमच राज्य शासन उत्सवात सहभागी होणार असून यासाठी शासनाने सुमारे ११ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी केली आहे.

याबाबत मंत्री शेलार म्हणाले, जगात आणि देशात आपल्या गणेशोत्सवाची ओळख सर्वात मोठा महोत्सव म्हणून झालेली आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे.

शासन निर्णयानुसार तालुका स्तरापासून राज्य स्तरावर विविध गणेशोत्सव मंडळ जे धार्मिक प्रथा परंपरानुसार सहभागाने पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रमात काम करणाऱ्या



गणेशोत्सव मंडळांना पारितोषिकाची घोषणा केली आहे. तसेच गिरगाव चौपाटीवर ड्रोन महोत्सव आयोजन करण्यात येणार असून पुणे, नाशिक, नागपूर, मुंबई आणि राज्यातील सर्व भागात स्थानिक स्तरावर शक्य असेल त्या सार्वजनिक ठिकाणी रोषणाई करण्यात येणार असून यावर्षीपासून घरबसल्या नागरिकांना गणरायांचे दर्शन व्हावे यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मची निर्मिती करण्यात येत आहे. गणेशोत्सव काळामध्ये भजनी मंडळांना भजनामधील साहित्यासाठी थेट लाखो रुपयांचे अनुदान देण्याची योजना घोषित झाली आहे. परदेशातही गणरायाचे आगमन धुमधडाक्यात व्हावे, म्हणून हा राज्य महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा, ही भूमिका घेण्यात आली आहे.

हा 'गणेशोत्सव- राज्य महोत्सवाचा' शासन निर्णय गणरायाच्या चरणी घोषित करताना आनंद होत असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले. याबाबत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा आणि विविध कार्यक्रम यांचे दोन स्वतंत्र सविस्तर शासन निर्णय ही जारी करण्यात आले आहेत. पु. ल. देशपांडे कला अकदामी आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे या महोत्सवाचे नियोजन व समन्वय करण्यात येणार आहे.

संपूर्ण राज्यभर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. महाराष्ट्राची कला व संस्कृती आणि परंपरेचे दर्शन या कार्यक्रमांतून घडेल. हे कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राबाहेर ज्या ठिकाणी मराठी बांधव मोठ्या प्रमाणात आहेत त्या ठिकाणीही करण्यात येईल. तसेच मराठी भाषिक बहुल भारताबाहेरील काही देशामध्ये सांस्कृतिक कार्यक्रांचे आयोजन करण्यात येईल.

□ संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com